म. ग्रं.
विषय
ग्रं. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
६१
संग्रहालय क्रमांक
६१
लेखक
पुस्तकाचें नांव
सन

९५

# प्रश्नोत्तर शेखर.

हें पुस्तक

रावजी श्रीधर गोंधळेकर याणीं

कितीएक मित्रांच्या साहाय्यानें

एकत्र करून.

पुणें

पेठ शनवार मेहुणपुरा येथें

आपले "जगद्धितेच्छु" छापखान्यांत छापिलें

असे.

तारिख १५ माहे मे सन १८७१.

इ.

सन १८६५ चा आक्ट २५ प्रमाणे याचा सर्व प्रकारें हक्क आपणाकडे ठेविला आहे.

आवृत्ति १ली.

किम्मत १० आणें.

# सूचना.

हें पुस्तक कितीएक ठिकाणीं शास्त्री, पंडित, नवीन सुधारलेले विद्वानलोक यांच्या जागोजा ग सभा भरून जाहलेले संभाषणांतील कांहीं भागांचा आमचे मित्रानीं संग्रह केला होता, तो आह्मीं एकत्र करून लोकांचा संशय दूर व्हावा याजकरिता छापला आहे.

## अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १. | वेद स्वतः प्रमाण ईश्वर निर्मित व अनादि आहे या विषयीं. | १ पासून १८ |
| २. | पृथ्वीचा आकार व परिमाण या विषयीं. | १९—२५ |
| ३. | ग्रहणा विषयीं. | २६—४४ |
| ४. | आकाशादिकांच्या वेदोक्त उत्पत्ती विषयीं. | ४५—५१ |
| ५. | कर्म, उपासना व ज्ञान यांच्या अधिकारा विषयीं. | ५२—६० |
| ६. | पूर्व जन्म आणि पुनर्जन्म आहे याविषयीं. | ६१—६९ |
| ७. | पूर्वजन्म आणि पुनर्जन्म नमानल्यास दोष आहे याविषयीं. | ७०—७६ |
| ८. | स्त्रिया व शूद्र इत्यादिकांस वेद पठण कां नाहीं या विषयीं. | ७७—९२ |
| ९. | प्रारब्ध आणि उद्योग म्हणजे काय याविषयीं. | ९३—१०९ |
| १०. | सकाम आणि निःकामकर्म याचा भेद आणि कर्म न करण्यांत दोष याविषयीं. | ११०—११३ |
| ११ | सृष्टि मिथ्यात्वा विषयीं. | ११४—१२१ |
| १२. | स्त्रिया व पुरुष यांच्या योग्यतेचे तारतम्या विषयीं. | १२२—१३५ |
| १३. | स्त्रियांस परतंत्रता असण्याचे कारण व स्त्रीपुरुषांस विषय सेवनाचा निर्बंध कसा आहे याविषयीं | १३६—१४० |
| १४. | वेदाच्या निर्बंधा प्रमाणें मद्य मांस सेवन न केल्यास भय आहे या विषयीं. | १४१—१४९ |
| १५. | स्त्रियांस पुनर्विवाह नाहीं व स्त्रीपुरुषांच्या लग्नाचे काल या विषयीं. | १५०—१७२ |
| १६. | वेद कधीं झाले व त्याचे चार भाग व्यासानीं कधीं केले आणि व्यासाच्या उत्पत्तीच्या संशयाचें निराकरण या विषयीं. | १७३—१७९ |
| १७. | वेदां मधील शाखां विषयीं. | १७९—१९१ |
| १८. | मुख्य यजुर्वेद तैतीर्य शाखा आहे या विषयीं. | १९२—२०० |
| १९. | वेदांस अनुसरून असणाऱ्या पारमार्थिक ग्रंथ लक्षणा विषयीं निर्बंध. | २०१—२०५ |
| २०. | आस्तिक व नास्तिक पाखांडी ह्मणजे काय याविषयीं. | २०६—२१० |
| २१. | वेदानी आणि नास्तिक यांमध्यें भेद काय आहे याविषयीं. | २११—२१४ |
| २२. | ग्रंथोपसंहार व उत्तरें देणारे गृहस्थ कोणी सिद्ध पुरुष होते या विषयीं. | २१५—२१५ |


अनुक्रमणिका समाप्त.

श्री

# प्रश्नोत्तरशेखर.

प्रश्न १– ह्या सृष्टींत मोक्षपुरुषार्थ म्हणजे परमार्थ, आणि तत्साधनोपयोगी प्रपंच याविषयीं सकल मनुष्यमात्रांस उपयुक्त, असा सर्वमान्य ग्रंथ कोणता ?

उत्तर १– ईश्वर वाणिरूप स्वतः प्रमाण वेद.

प्रश्न २ – असें आहे तर वेदास सर्व कां मानीत नाहींत ?

उत्तर २– अज्ञानानें किंवा विपरीत ज्ञानानें अथवा दुराग्रहानें मानीत नाहींत.

प्रश्न ३ – मला वाटतें कीं, वेद अप्रमाण असेल, म्हणून कित्येक त्यास मानीत नसतील ?

उत्तर ३– वेद सकल ग्रंथमात्रांस मूळ असल्यामुळें, तो परप्रमाण सापेक्ष्य नाहीं यास्तव तो प्रमाणरहित वाटतो इतकेंच, वस्तुतः त्यास प्रमाणाची अपेक्षा नाहीं.

प्रश्न ४ – तर मग वेद सप्रमाण आहे, हा निर्णय कशावरून करावा ?

उत्तर ४ – हा निर्णय वेदावरूनच करावा. कारण तो स्वतः प्रमाण आहे.

प्रश्न ५ – ज्याला प्रमाण तोच, हें स्वस्कंधारोहण न्यायानुरूप, असंभाव्य आणि अघटित आहे.

उत्तर ५ – विचारवानास संभाव्य. आणि सुघटितच आहे.

प्रश्न ६– वेद स्वतः प्रमाण आहे, याचा विचार कसा करावा ?

उत्तर ६– जसा ब्रम्हांडाचा विचार पिंडावरून म्हणजे आपल्या देहावरून करावा तसा ईश्वर वाणिरूप वेदांचा विचार आत्मवाणीवरून करावा.

प्रश्न ७ – हें भाषण माझ्या कांहींच लक्षांत आलें नाहीं ?

उत्तर ७ – सावध होऊन माझ्या प्रश्नाचें उत्तर दे, म्हणजे आपोआप लक्षांत येईल.

प्रश्न ८– मी असें पुसतों कीं, तुला वाचा आहे काय ?

उत्तर ८ – हें काय पुसावें, होय आहे.

प्रश्न ९ – कशावरून, ती असल्या विषयीं प्रमाण काय ?

उत्तर ९ – तिला दुसरें प्रमाण कशास पाहिजे. मी प्रत्यक्ष तिच्याच योगा-

में बोलत आहें, म्हणून ती आहे, आणि या वरून आतां, माझ्या लक्षांत आलें कीं, वाणी जशी स्वतः प्रमाण आहे असाच वेदही आहे.

प्रश्न १० — वाणीस अन्यत्र प्रमाण नाहीं, म्हणून ती विषयीं अप्रामाण्य शंका व्हावी कीं कसे?

उत्तर १० — होऊं नये व आतां मला ती शंका अगदीं नाहीं.

प्रश्न ११ — आतां मी असें पुसतों कीं, आमच्या भाषणांत जशा चुक्या असतात तशा वेदांतही चुक्या झाल्या नसतील म्हणून कशावरून?

उत्तर ११ — हा वादीचा प्रश्न ऐकून, सिद्धांती म्हणतो ऐक. तुम्हा अज्ञान जीवांच्या ठायीं भ्रम प्रमाद इत्यादिक दोष असल्यांमुळें, तुमच्या भाषणांत चुका होतील हें नीटच आहे. परंतु ईश्वर हा सर्वज्ञ असल्यांमुळें, तो भ्रम प्रमादादि दोष रहित आहे, या कारणास्तव त्याच्या वेदरूपवाणींत चुकच होणें नाहीं, असा निश्चय समज.

प्रश्न १२ — ईश्वर भ्रम प्रमादादिक दोष रहित आहे, हा निश्चय कशाव-रून करावा?

उत्तर १२ — सिद्धांती म्हणतो सावध होऊन ऐक. ईश्वरानें, जी ही सृष्टि निर्माण केली आहे, तीमध्यें, पृथिव्यादिक पंचमहाभूतें, सूर्य चंद्रादिक नक्षत्रें, वसंतादिक काल आदिकरून लक्षावधि पदार्थ आहेत व ते उत्पन्न केल्याला ही कोट्यावधि वर्षे झाली आहेत, असें असून आजपावेतों अमुक पदार्थांत अमुक चूक अशी आढळली नाहीं व पुढेंही आढळेल असें नाहीं. म्हणून सृष्टी विषयीं जसे ईश्वरास भ्रम प्रमादादिक दोष नाहींत. असेंच वेदांविषयींही नाहींत. अशा प्रकारें याचा निश्चय करावा.

प्रश्न १३ — तुझ्या उत्तरांत मन गारच होतें. संशय राहातच नाहीं व सूचक प्रश्नही पुष्कळ होतात, ते सवडी साररवे पुसेन. असो, परंतु. सध्या असें पुसतों कीं, सृष्टि उत्पन्न झाल्याला कोट्यावधि वर्षे झाली म्हणून कशावरून?

उत्तर १३ — सृष्टींतील एक पदार्थ पृथ्वी, हा प्रथम घेऊन याचा विचार सांगतों म्हणजे सर्व लक्षांत येईल, पृथ्वी ही पाण्या पासून उत्पन्न झाली आहे, ती पाणी घट्ट जमून झाली आहे, पाणी घट्ट होऊन कोट्यावधी कोस लांबी रुंदीची व जाडीची पृथ्वी सिद्ध होण्यास, किती

कृतीवरून ध्यानांत आणशील तर किती काळ लागेल हें तुझें सहज लक्षांत येईल, म्हणून पृथ्वी बहुत काळामागें उत्पन्न झालेली असून तिजवर मनुष्यांची वसाहतही कोट्यावधि वर्षांमागेंच झालेली आहे, बाकी भूतें पृथ्वीच्या आधींचीं असल्यामुळें त्या विषयीं विशेष बोलणें नको.

प्रश्न १४ – ईश्वरानें तर ही सृष्टि संकल्पमात्रें करून निमिषही लागलें नाहीं तों केली. तेव्हां वरील उपपत्तीशीं विरोध आला याचा परिहार कसा?

उत्तर १४ – तूं जो पक्ष स्वीकारिला आहेस, त्यास सोडून हा प्रश्न तूं केलास हें काय? यासाठीं धरसोड करूंनको. जग हें सत्य आहें, हा तुझा मूळ पक्ष आहे, त्याचें जें दिलें तेंच उत्तर होय. जग मिथ्या असें जेव्हां तुला समजूं लागेल, तेव्हांचा विचार तेव्हां पाहूं.

प्रश्न १५ – बरें आहे व मी घसरलों हेंही खरें आहे, आतां मी असें पुसतो कीं, वेद जो आहे हा कोणत्या काळीं झाला?

उत्तर १५ – गर्भांतील बालकाचें उपजीवन जें मातृस्तनस्थित दुग्ध तें जसें परमेश्वर आधींच निर्माण करून ठेवितो व बालक बाहेर येतांच प्रगट करितो, त्याच प्रमाणें मनुष्यमात्र उत्पन्न होण्याच्या पूर्वींच ईश्वराजवळ अर्थरूपानें असलेला वेद, स्वयंभूच्या द्वारें अक्षर रूपानें ईश्वरानें प्रगट केला, असा हा वेद बहुतकाळा पूर्वींचा आहे.

प्रश्न १६ – वेद प्रगट करण्यास म्हणजे निर्माण करण्यास ईश्वरच कशास पाहिजे. तो स्वभावें करूनच उत्पन्न झाला, असें म्हटल्यास काय बाधआहे?

उत्तर १६ – तूं स्वभाव म्हणतोस तो मला ग्राह्य आहे, पण हा स्वभाव को..चा, दाहक शक्ति पण कोणाची, असा विचार कर, म्हणजे स्वभाव हा स्वतः सिद्ध नव्हे असें तुझ्या लक्षांत येईल, व त्यास जों कोणी अधिष्ठान असणारा, तो स्वभावी स्वतः सिद्ध आहे असें तूंच कबूल करशील, यास्तव दाहक शक्तिरूप जो अग्नीचा स्वभाव, तो स्फोटादि कार्यासिं जसा कारण असतो तसा सृष्टि कर्तृत्वरूप जो ईश्वराचा स्वभाव, तोच सृष्ट्यादि कार्यास कारण समज. म्हणजे स्वभाव हा जड आणि परतंत्र असल्यामुळें, चैतन्य रूप जो ईश्वर, तोच वेदांसहवर्तमान सकल सृष्टीचा कर्ता होय असें समज.

प्रश्न १७ – यावरून दाहक शक्ति जशी अग्नि आहे, म्हणून आहे म्हणावी, तसा सृष्टीसहवर्तमान वेदास कारण जो सृष्टिकर्तृस्वरूप स्वभाव, तो ईश्वर आहे म्हणून आहे, येन्हवीं नाहीं. असाच सिद्धांतना ?

उत्तर १७ – होय, असाच सिद्धांत.

प्रश्न १८ – ही गोष्ट तर चांगली ध्यानांत आली. आतां मीं असें पुसतों कीं, पृथ्वी फार मोठी आहे म्हणून कशावरून ?

उत्तर १८ – तिचा कोणास अंत लागत नाहीं यावरून.

प्रश्न १९ – अंत कसा लागत नाहीं. तिजभोंवतीं पुष्कळ लोक प्रदक्षिणां करून आले आहेत.

उत्तर १९ – आले असतील पण प्रदक्षिणा केल्यानें अंत लागला असें होत नाहीं.

प्रश्न २० – कां बरें, जर एक पुरुष पूर्वेकडे व दुसरा पश्चिमेकडे गेला, तर ते मार्गांत परस्परांस भेटतात, तेव्हां अंत कसा लागला नाहीं ?

उत्तर २० – ही तुझी अज्ञ जे ज्योतिषी त्यांचे मतावर विश्वास ठेवल्यामुळें चूक आहे.

प्रश्न २१ – ती कशी ?

उत्तर २१ – तूं मनांत आणकीं, एका देवालयांत तूं व मी देवासन्मुख उभे आंहों, त्यांत मी देवांस सव्य घेऊन प्रदक्षिणा करण्यास निघालों, व तूं देवास अपसव्य घेऊन निघालास, तेव्हां तुझी व माझी मध्यें भेट झालीं, त्यावरून कायतें देऊळ येवढेंच, असें जर आपण ह्मणूं लागलों, तर तें म्हणणें जसें वेडेपणाचें आहे, त्याच न्यायानें पृथ्वी लहान ह्मणणें हेंही होय, यास्तव देवळाची जागा जशी मोठी व विस्तीर्ण आहे, तशीच पृथ्वीही आहे.

प्रश्न २२ – यावरील उदाहरणावरून पृथ्वी सपाट असून, लोक तिच्या वरचे वरच वर्तुळाकार गतीमें प्रदक्षिणा करून येतात, असें तुझें मत दिसतें ?

उत्तर २२ – तूं म्हणतोस असेंच वेदास अनुसरून माझें मत आहे.

प्रश्न २३ – पण सपाटीवर वर्तुळाकार फिरल्यानें, पूर्व पश्चिम प्रदक्षिणा कशी होईल.

उत्तर २३ – वेदामध्यें, सूर्य पृथ्वीच्या वरचे वर वर्तुळ गतीनें मेरू सभोंव-

ता फिरतो असें सांगितलें आहे, त्या सूर्याच्याच अनुरोधानें ज्योतिषी फिरतात म्हणून पूर्व पश्चिम प्रदक्षिणा होण्यास शक्य आहे, ध्रुवाच्या अनुरोधानें फिरतात असें जरी म्हणशील, तरीही प्रत्यवाय येणार नाहीं. ही दिग्व्यवस्था पुराणांत सांगितलेलीच आहे, म्हणून मी येथें सांगत नाहीं.

प्रश्न २४ – अरे पण पृथ्वी गोलाकार आहे, यास प्रमाणें पुष्कळ आहेत. त्यांत पहिलें असें आहे कीं, समुद्रांतून लांबून गलबत येत असतां प्रथम त्याचें शीड दिसतें, नंतर तें जसजसें जवळ येत जातें, तसतसें तें दिसत दिसत सर्व दिसायास लागतें. तस्मात् पृथ्वी गोल नाहीं कशी?

उत्तर २४ – दिसेल, त्याचें आश्चर्य नाहीं, व गलबत तसें दिसलें म्हणून पृथ्वी गोलाकृतीच आहे, असें संभवत नाहीं, मनांत आण कीं, तूं पांचशेंहात लांबीच्या दिवाणखान्यांत उभा आहेस, जेव्हां तूं दिवाणखान्याच्या कोणे एके टोंकास उभा राहतोस, तेव्हां तुला त्याचें दुसरें टोंक पराकाष्ठेचें उतरतें दिसेल, मधोमध उभा राहिलास, तर दोनी ही टोंकें उतरतीं दिसतील, असें दिसण्याचें कारण, दिवाणखान्याची भूयी उतरती आहे हें म्हणावें काय? तर तसें नव्हे, दिवाणखाना उतरता दिसण्याचें खरें कारण जसा दृष्टिदोष होय, तसेंच गलबत दिसण्याचें कारण दृष्टिदोष होय, पृथ्वीची गोलाकृति नव्हे, याचा नीट विचार कर.

प्रश्न २५ – हें प्रमाण असो, परंतु पृथ्वी जर गोल नसती, तर चंद्रग्रहणांत चंद्रावर तिची छाया वर्तुळ न पडती, वर्तुळ छाया तर प्रत्यक्ष आपण पहातों, यास्तव पृथ्वी गोलाकारच आहे?

उत्तर २५ – चंद्रग्रहणास कारण पृथ्वीची छाया मुळींच नाहीं, चंद्रग्रहणाचें कारण असें आहे कीं, एक राहु या नावाचा अप्रकाशरूप तामसग्रह आहे, तो नेहेमी सूर्यगतीनें फिरत असतो, आणि तसा फिरतां फिरतां जेव्हां चंद्राच्या आड येतो, तेव्हां चंद्रग्रहण होतें. किंवा सूर्याचे जागीं पृथ्वी फिरते असें मानणारे जे भूभ्रमवादी, त्यांस तो राहु ओळखीस न येऊन पृथ्वीच आड आली असें वाटतें व त्यामुळेंच चंद्रग्रहणास, ते पृथ्वीची छाया कारण मानतात, परंतु चंद्रग्रहणास कारण ना पृथ्वी ना तिची छाया, असें पक्कें पक्कें समज.

प्रश्न २६ – पृथ्वीची छाया चंद्रग्रहणास कारण नाहीं, हें सबळ प्रमाणा

वांचून माझ्यानें अंगीकारवत नाहीं ?

उत्तर २६ – मला आतां चांगलें स्मरत नाहीं कीं, शालिवाहनाचें कितवें वर्ष होतें तें, एकदां मी नहरास जाण्यास निघालों असतां, कांहीं कारणामुळें साताऱ्यावरून न जातां वांई वरून जाते वेळीं, चंद्रग्रहण उद्यां आहे असें समजल्या वरून मी वाईस मुक्काम केला. दुसरे दिवशीं, पहांटेस कृष्णा स्नानास ग्रहण लागल्यानें स्नास करावयास गेलों, कारण ग्रहण पाहांटेस होतें. पुढें स्नान केल्यावर पुष्कळ मंडळी धर्मशाळेच्या गच्चीवर गेली, म्हणून मीही गेलों; आणि ग्रहण पाहूं लागलों, तो समय चंद्र अस्तास जाण्याचा होता, व सूर्य उदयास येण्याची संधि होती त्या वेळेस मला असें दिसलें कीं, पूर्व क्षितिजावर सूर्य स्पष्ट, व पश्चिम क्षितिजावर चंद्र स्पष्ट असून, चंद्रास ग्रहण लागलेलेंच होतें. आतां तूं असें पहा कीं, सूर्य आणि चंद्र दोहोंकडे स्पष्ट दिसत असून, जर चंद्रास ग्रहण होतें तर तें पृथ्वीच्या छाये पासून झालें असें होत नाहीं, कारण त्या काळीं मुळींच छायेचा असंभव. या कारणास्तव, चंद्र ग्रहणास कारण पृथ्वीची छाया म्हणतां येत नाहीं, मात्र अशीं ग्रहणें वारंवार येत नाहींत, आणि आलीं तरी अल्पकाळ दिसणारीं असतात, कांकीं चंद्र किंवा सूर्य, यांतून कोणीतरी एक, सत्वर जाणारा असतो, म्हणून ज्योतिषांचें लक्ष तिकडे पोहोंचत नाहीं इतकेंच.

प्रश्न २७ – येथें तर माझें बोलणेंच खुंटलें. ?

उत्तर २७ – वास्तविक सिद्धांता पुढें असें व्हावें, हा नियमच आहे.

प्रश्न २८ – झालें तर मग, याच न्यायानें, सूर्यग्रहणासही चंद्र कारण नसेल.

उत्तर २८ – नाहींच, कारण चंद्र हा मुळींच सूर्याच्या वर आहे, तर मग सूर्यग्रहणास कारण कोण असें म्हणशील तर सांगतों कीं, केतु म्हणून जो तामस ग्रह आहे तो सर्वकाळ चंद्र गतीनें फिरत असतो. आणि फिरतां फिरतां सूर्या आड आला म्हणजे सूर्यग्रहण होतें.

प्रश्न २९ – चंद्र, सूर्याच्या वर आहे यास काय प्रमाण ?

उत्तर २९ – वेदवाक्य प्रमाण, कारण वेद हा ईश्वराची वाणी आहे. यस्तव, त्यावर विश्वासच पाहिजे.

प्रश्न ३० – प्रत्यया वांचून विश्वास ठेवणें, हें मला नीट वाटत नाहीं ?

उत्तर ३० – प्रत्यय आल्यावर विश्वास ठेवण्यास सांगावें लागत नाहीं. तो मग आपो आपच रहातो. वैद्य आपणास औषध देतो, तें जसें प्रथमतः विश्वासानेंच घ्यावें लागतें, प्रत्यय पुढें येतो. तोच न्याय वेद आणि गुरु यांच्या वाक्या विषयीं समजं.

प्रश्न ३१ – वेदवाक्य आणि आप्त म्हणजे यथार्थ भाषण करणारा गुरु, यांचें वाक्य प्रमाण मानावें असा न्याय आहे. यास्तव ही गोष्ट मला मानली, तथापि चंद्र हा सूर्याच्या वर आहे, याचा प्रत्यय कसा ?

उत्तर ३१ – तुला माझ्या नेत्रांहून जसें माझें मन दूर आहे. तसाच, ब्रह्मांडरूपी ईश्वराचा चक्षू जो सूर्य, त्याहून त्याच ईश्वराचें मन जो चंद्र, तो ही दूर आहे

प्रश्न ३२ – पुरुषसूक्तांत सांगितलेल्या ऋचेचा आज मला अर्थ समजला. एवंच सारांश हाच कीं पृथ्वी गोलाकार नाहीं व लहानही नाहीं, पण माझा अजून संशय जात नाहीं. यास काय करावें ?

उत्तर ३२ – ज्योतिषी लोक, पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे जें स्थल सोडून निघून माघारे न फिरतां पुनः त्याच स्थळीं येतो असें म्हणून पृथ्वी गोलाकार व लहान आहे असें सांगतात. ही गोष्ट ज्या दिवशीं, ते उत्तरेकडे किंवा दक्षिणे जें स्थळ सोडून निघून माघारे न फिरतां पुनः त्याच स्थळीं येतील, त्याच दिवशीं सत्य म्हणतां येईल. असा निश्चय करून संशय सोड, आणि वेदवाक्यच प्रमाण मानून स्वस्थ रहा.

प्रश्न ३३ – ही जी युक्ति तूं सांगितलीस, ती उत्तम आहे पण हे ज्योतिषांवर कोडें घातलेंसे होतें, असें मला वाटतें ?

उत्तर ३३ – कोडें कांबरें होईल म्हणतोस. जर पृथ्वी गोलाकार आणि लहान आहे तर त्यांच्या मना प्रमाणें जेवढी पूर्व पश्चिम प्रदक्षिणा आहे, तेवढीच दक्षिणोत्तरही आहे असें नाहीं; किंचित् कमीच आहे. कारण पृथ्वी दक्षिणोत्तर दोन बाजूंस नारिंगाच्या फळा प्रमाणें चापट आहे, असें असतां, या माझ्या युक्तीस कोडें म्हणणें योग्य नाहीं.

प्रश्न ३४ – अशा दृष्टीनें कोडें नाहीं ही गोष्ट खरी. पण तिकडे थंडी इत्यादिक फार आहे या दृष्टीनें कोडें अशी आहे. कारण त्यांच्यानें त्या-

थंडी इत्यादिकांमुळें तिकडे जाववतनाहीं.

उत्तर ३४ – तूं म्हणतोस ही गोष्ट आपल्याकडील ज्योतिषांस लागू आहे. कारण यास अग्निसाध्य जलयानादिकांची अनुकूलता नसून मद्य मांस आहार नाहीं, आणि सोंवळ्या ओंवळ्याचीही पराकाष्ठेची अडचण आहे. तसा इंग्रजांस कांहींच प्रतिबंध नाहीं, म्हणून त्यांनां ही गोष्ट अगदीं लागू नाहीं

प्रश्न ३५ – येथें माझें बोलणें सरलें. आतां मी असें पुसतों कीं, सूर्य हा पृथ्वीपेक्षां लहान कीं मोठा. जर मोठा असेल, तर तिजवर त्याचें आकर्षण घडून ती त्या सभोंवतीच फिरत राहील ?

उत्तर ३५ – शरीराच्या प्रमाणाहून जसें चक्षूचें प्रमाण अल्प आहे. तसें ईश्वराच्या पृथ्वीरूप शरीर भागाहून त्याचा चक्षु जो सूर्य, त्याचें प्रमाण अल्प आहे. म्हणजे पृथ्वीपेक्षां सूर्य लहान आहे, असें समज.

प्रश्न ३६ – एवंच सूर्य लहान असल्यामुळें, त्याचें आकर्षण तिजवर पडत नाहीं, आणि याच कारणास्तव ती त्या सभोंवती फिरतही नाहीं. हाच तुझा सिद्धांत कीं नाहीं. ?

उत्तर ३६ – होय होय! वेदास अनुसरून हाच माझा सिद्धांत आहे.

प्रश्न ३७ – बरें, ह्या सर्व गोष्टी असूंदेत. आतां मी एकच अशी गोष्ट पुसतों कीं, ज्योतिषी जेवढी पृथ्वी लहान आहे म्हणतात. ती जर, वास्तविकच तेवढी नसती, तर तिच्या परिधी वरून, सूर्य चंद्रादिकांचें उदयास्त युति, आणि ग्रहणें इत्यादिक साधलेलीं कशीं बरोबर येतीं. ?

उत्तर ३७ – इष्टराशीच्या उदाहरणांत, दाहाजणांनीं दाहा संख्या निरनिराळ्या धरून, जरी गणित केलें. तरी सर्वांचें उत्तर जसें एकच येतें. त्याचन्यायानें, सूर्य सिद्धांत कारानें, भास्कराचार्यानें, व न्यूटनादि इंग्रज ज्योतिषानें, जरी निरनिराळे परिधि मानले आहेत. तरी उदयास्तादिक उत्तरें, सर्वांची सारखींच यावयाचीं तशींच येतात. मग बाध तो कोणता ? तूं म्हणशील कीं, त्याच्या गणितानें आलेले उदयास्त घटिका दोन घटिकांचे अंतराचे असतात तसे आमचे नसतात. तर ही गोष्ट कसर सोडल्यामुळें होते. तुम्ही जशी कसर सोडीत नाहीं; तशीच ते जर कसर सोडणार नाहींत, तर अंतर कधींच पडणार नाहीं; अथवा असेंही जरी म्हणशील कीं, क-

सर धरूनही त्यांचें गणित बरोबर येत नाहीं. तर कालाची गति अत्यंत सूक्ष्म असल्या मुळें, तुमचें तरी गणित बरोबरच असेल असें कशा वरून म्हणावें. यास्तव, इष्ट राशीचें उदाहरण जसें दाहा जणानीं दाहा संख्या धरून केलेलें, त्याची त्या परस्परानीं वास्तविक उत्तरांशीं गांठ घालून समाधानानें असावें. तूं संख्या धरिलीस ती खोटी, माझी खरी, असा वाद करीत बसूं नये. त्याच प्रमाणेंच सूर्यादि सिद्धांतकारानीं परिधि विषयक वाद सोडून स्वस्थ असावें यद्दा भिन्न भिन्न उत्तरें जरी येत असलीं. जसा तुमचा व आमचा अधिक मास तरीही विरोध नाहीं. कारण कित्येक उदाहरणें अनेकोत्तरीही असतात.

प्रश्न ३८ – सारांश उदयास्तादिक जरी यावेत तसे अनुभवास आले, तरी पृथ्वीचा परिधि, जोजो ज्यानें ज्यानें धरिला, तो तो, खराच मानिला पाहिजे असें कांहीं नाहीं, असेंच ना. ?

उत्तर ३८ – होय असेंच.

प्रश्न ३९ – तर मग वेदोक्त परिधिच कां लोकानीं गणितात घेऊं नये ?

उत्तर ३९ – घ्यावा, नाहीं कोणाची आहे.

प्रश्न ४० – तर कां घेत नाहींत ?

उत्तर ४० – अंकांची घडामोड फार असेल, म्हणून घेत नसतील.

प्रश्न ४१ – बरें सांप्रत ज्योतिषी पृथ्वी जी अल्प परिमाणाची मानतात. हा तुझ्या वेदोक्त पृथ्वीचा कितवा भाग आहे ?

उत्तर ४१ – ज्योतिषानीं जीं च्यार खंडें मिळून पृथ्वी मानली आहे, ती च्यार खंडें चार देश अथवा एक मंडल आहे, आणि सात द्वीपांत मिळून लक्ष मंडलें आहेत, या कारणास्तव ज्योतिषांची पृथ्वी, आमच्या पृथ्वीचा लाखावा भाग आहे.

प्रश्न ४२ – लक्ष मंडलांची व्यवस्था कशी ?

उत्तर ४२ – जंबुद्वीपांत मंडलें ७७५ आहेत. दुसऱ्या द्वीपांत १५७५ आहेत. तिसऱ्यांत दुप्पट ३१५०, चौथ्यांत दुप्पट म्हणजे ६३०० आहेत. या प्रमाणेंच दुपटीनें क्रमें करून पांचव्यांत, साहाव्यांत, व सातव्यांत १२६००, २५२००, आणि ५०४०० हीं सर्व मिळून एक लक्ष होतात अशी लक्ष मंडलांची व्यवस्था आहे.

प्रश्न ४३ – देश हा काय प्रमाणाचा असतो ?

उत्तर ४३— चारशें कोस औरस चौरस म्हणजे ज्याचें क्षेत्र फळ १६०००० एक लक्ष साठ हजार कोस असतें, तें देशाचें परिमाण असें समजावें.

प्रश्न ४४— मी पुष्कळ बोलका, पण तुझीं अलौकीक उत्तरें ऐकून तुझ्या पुढें हात टेंकले. असो, आतां माझ्या मनांत दुसरा कांहीं विषय आला आहे, त्या विषयीं कसें करूं विचारूं कीं नको?

उत्तर ४४— खुशाल विचार. मज कडून प्रतिबंध नाहीं.

प्रश्न ४५— वेदामध्यें वायूपासून अग्नि व अग्नी पासून पाणी उत्पन्न झालें म्हणून जें लिहिलें आहे. तें अनुभव विरुद्ध आहे. कारण, यांत्रिक शास्त्री-नें, वायू पासून पाणी व पाण्या पासून अग्नि, उत्पन्न होतो, असा प्रत्यय, आम्ही पुष्कळानीं घेतला आहे, तेव्हां हें कसें?

उत्तर ४५— हा प्रश्न तूं जो केलास, हा तुझ्या शास्त्री, या नावास बट्टा लागण्या जोगा आहे, असो, माझें काम उत्तर देण्याचें आहे. यास्तव मी सांगतों तें सावध होऊन ऐक. सध्या जीं वायु आदि करून भूतें आपण अनुभवतों. हीं केवळ तन्मात्रात्मक अपंचीकृत अभिश्र तत्वें नव्हत, तर हीं, मिश्र पंचीकृत भूतें आहेत. म्हणजे त्या वायु अग्नि आप, पृथ्वी भूतांत, इतर चारी भूतांचे अंश मिश्रित आहेत. त्या मुळें, वायू पासून उदक होतें व उदका पासून अग्नि प्रत्ययास येतो. तसाच गारे पासून जो अग्नि चकमकेनें प्रगट होतो, तोही होण्याचें कारण, हें पृथ्वी भूत मिश्र आहे, म्हणूनच आहे, या विषयीं दासबोध दशक ८ वा पहा, आणि वेद जें बोलला, तें तन्मात्रात्मक भूतां विषयीं बोलला, असें समजून संशय रहित हो.

प्रश्न ४६— तन्मात्रात्मक भूतांचा विचार कसा! हा मला स्पष्ट करून सांग?

उत्तर ४६— शब्द तन्मात्रात्मक आकाश आहे. स्पर्श तन्मात्रात्मक वायु आहे. रूप तन्मात्रात्मक तेज. रस तन्मात्रात्मक आप, आणि गंध तन्मात्रात्मक पृथ्वी यांत शब्द तन्मात्रे पासून स्पर्श तन्मात्रा झाली, तिज पासून रूप तन्मात्रा झाली, तिज पासून रस तन्मात्रा झाली, आणि ती पासून पुढें गंधतन्मात्रा झाली. आतां कारणाची अनुवृत्ति कार्यांत असते, हें तर तुला ठाऊक आहेच. त्या न्यायानें, स्पर्श तन्मात्रा, शब्द तन्मात्रेचें कार्य आहे, म्हणून, तीस कारण जी शब्द तन्मात्रा, तिची अनुवृत्ति दिसत्ये, रूप तन्मात्रा स्पर्श तन्मात्रे पासून झाली आहे म्हणून, तींत स्पर्श अनुवृत्ति दि-

सत्ये, रूप तन्मात्रेचें कार्य, रस तन्मात्रा आहे, म्हणून रूपाची अनुवृत्ति रस-तन्मात्रेंत दिसत्ये. आतां, तुझ्या यांत्रिक अनुभवा प्रमाणेंच जर भूतांचा अनुक्रम आहे, तर वायू पासून उत्पन्न झालेलें उदक, त्यांत स्पर्शतन्मात्रेची व शब्द तन्मात्रेची मात्र अनुवृत्ति असावी. रूपतन्मात्रा ही तर अग्नीची आहे; आणि अग्नी तर तुझ्या अनुभवा प्रमाणें, रस तन्मात्रे पासून पुढें उत्पन्न होणारा आहे. असें असतां, रस तन्मात्रेंत जी रूपानुवृत्ति दिसत्ये, ती रूपतन्मात्रा रस तन्मात्रेचें कारण आहे म्हणून दिसत्ये. कार्य असून दिसत नाहीं. आणि जर दिसेल, असें म्हणशील तर कार्याची अनुवृत्ति कारणांत झाल्यानें ही गोष्ट न्याया विरुद्ध होईल, या साठीं, वेदानें सांगितलेला उत्पत्ति क्रम, तोच खरा; असें निःसंशय समजून, पुनः असा वेद विरुद्ध कुतर्क करूं नको.

प्रश्न ४७ — वादी विस्मित होतो आणि मनाशीं बोलतो. हें उत्तर तर, परमावधि महत्वाचें होय. अहा! हा, प्रश्न पुसावा तर अशाच स्थळीं पुसावा. असें म्हणून सिद्धांती यास म्हणतो, तूं केवळ मला साक्षात्कारी दिसतोस. धन्य हें तुझें ज्ञान व हें जेथून तुला प्राप्त झालें, ते तुझे गुरुही परम धन्य होत. काय सांगावें? तूं माझा बाळमित्र आहेस, असें जाणून अरे तुरे या शब्दानें मी तुजशीं जो भाषण व्यवहार केला. त्याची मला क्षमा असावी; आणि येथून, मी जो शब्द व्यवहार ठेवणार, त्या विषयीं मला मोकळीक द्यावी.!

उत्तर ४७— तुझी इच्छा असेल तसें कर.

प्रश्न ४८ — मी, जोवर तन्मात्रा विषयीं प्रश्न केला, तो अप्रासंगिक तर खराच, पण, त्यांत एक कार्य फारच उत्तम झालें. तें हें कीं, वेदवाक्या विषयीं मला संशय म्हणून अगदीं राहिला नाहीं. आतां, मी आपल्यास असें पुसतों कीं, पृथ्वी जी अनंत मोठी, तिचा मध्य बिंदु जो मेरू पर्वत, त्या सभोंवता फिरणाऱ्या सूर्याचा प्रकाश, ज्या वलयाकार लोका लोक पर्वता पर्यंत पडतो; तितकींच पुढें अंधःकाराची मर्यादा मानून, झालेलें जें वर्तुळ. त्याचाच व्यास पन्नास कोटी योजनें मानला आहेना?

उत्तर ४८- होय, त्याच वर्तुळाचा व्यास, पन्नास कोटी योजनें मानला आहे.

प्रश्न ४९ — ह्या हिमालय पर्वता विषयीं, आपला अभिप्राय काय आहे?

उत्तर ४९— वास्तविक हिमालय, क्षार समुद्रा पासून, नऊ हजार कोसांवर आपल्या उत्तरेस आहे, म्हणून हा हिमालय, जो लोक पाहून येतात, तो वा-

त्त्विक नसून, हिमातिशयास्तव कल्पित आहे.

प्रश्न ५० — बरें, लोहचुंबक, दुर्बीण इत्यादिक यंत्रें, यां पासून होणारें ज्ञान, आपणास प्रमाण आहे कीं नाहीं ?

उत्तर ५० — नाहीं, कारण लोहचुंबक यंत्र, ज्यास होका यंत्र ह्मणतात. तें कधीं कधीं आपली मर्यादा सोडलें, असें तूंच कोलंबस ग्रंथाच्या भाषांतरांत लिहिलें आहेस, व दुर्बीण नीट धरिली, तर दूरचा पदार्थ जवळ दिसतो आणि उलटी धरिली तर जवळचा पदार्थ दूर दिसतो. तेव्हां, यां पासून होणारें ज्ञान, तथ्य कोणी मानावें. तथापि भूस्थ पदार्थाविषयीं, हीं यंत्रें म्हणजे पृथ्वीवरील पदार्थांचे निर्णया विषयीं उपयोगीं असतील, खस्थ म्हणजे आकाशांतील, पदार्थांचे निर्णया विषयीं सर्वकाळ सारखीं उपयोगी पडतील, असें होणार नाहीं.

प्रश्न ५१ — निरुत्तर होऊन स्तब्ध बसतो; आणि म्हणतो, आतां हा विषय पुरे ?

उत्तर ५१ — बरें आहे, पुरे तर राहूं दे.

प्रश्न ५२ — आतां मी असें पुसतों कीं, वेदांमध्यें काय काय, सांगितलें आहे ?

उत्तर ५२ — वेदामध्यें, मुख्यत्वें करून मोक्ष पुरुषार्थ साधण्याचा विचार सांगितला आहे. मानव देहास आलेल्या जीवानें, हळू हळू विषयांपासून, कसें निवृत्त व्हावें हें सांगितलें आहे, अधिकार भेदानें, कर्म, उपासना, आणि ज्ञान, या त्रिकांडाचा प्रकार सांगितला आहे. काम्यकर्मोपासनेनें, स्वर्गादिक लोकांतील सुखाचीं नश्वर फळें, व निषिद्ध कर्मोपासनेनें नरकादिकांतील दुःखाचीं फळें, सांगून, या फलाशेस कोणी गुंतूं नये म्हणून निःकाम कर्मोपासनेनें, चित्ताची शुद्धि व स्थिरता, यांच्या योगें निर्मल ब्रम्ह प्रत्यगात्मा ऐक्य ज्ञान साधून, अविनाश मोक्षसुखास जीवानीं पावावें, हाही विचार सांगितला आहे. तसेंच वैराग्य आणि नीति हें ही मोक्षपुरुषार्थास साधनभूत आहे. म्हणून तद्विषयीं, अनेक भूत व भावी असे इतिहास सांगितले आहेत, या शिवाय सृष्टीचे उपक्रम, उपसंहारादिक हे ही सोपपत्तिक सांगितले आहेत.

प्रश्न ५३ — कर्माचा अधिकारी कोण समजावा ?

उत्तर ५३ — कर्म करण्यांत ज्यास दुःख वाटत नाहीं, अधिकाधिक उल्हास च वाटतो. तो कर्माचा अधिकारी समजावा.

प्रश्न ५४ — उपासनेचा अधिकारी कोण समजावा ?

उत्तर ५४ – जो कर्म करण्या विषयीं केवळ आदर धरीत नाहीं, व केवळ अनादर ही करीत नाहीं, आणि स्वभावतः च जो ईश्वरीं प्रेम धरूं लागला. तो उपासनेचा अधिकारी होय.

प्रश्न ५५ – ज्ञानाचा अधिकारी कोण ?

उत्तर ५५ – जो कर्म करतां करतां कंटाळला, व तें आदरानें करण्याचा प्रयत्न कमी कमी करूं लागला असून, पुढें अगदींच उपरत झाला. तो ज्ञानाचा अधिकारी होय.

प्रश्न ५६ – जो कर्म करून करून कंटाळला असें तर नाहीं, परंतु ज्यानें आळसानें कर्म सोडलें, तो ज्ञानास अधिकारी होईल कीं नाहीं ?

उत्तर ५६ – होणार नाहीं. कारण, क्षीणदर्प झाला नाहीं, म्हणून, तो ज्ञानापासून पतन पावेल.

प्रश्न ५७ – येथे पतनसंभावना कशी, ती ध्यानांत येत नाहीं ?

उत्तर ५७ – ठाणबंध जो अनिवार अश्व, नदीच्या वाळवंटांत नेऊन, मंडळावर धरून, अंगाचा घाम घाम होई पर्यंत जर दमविला नसेल, म्हणजे क्षीणदर्प केला नसेल तर, तो जसा वरील बसणारास मार्गांत पतन करील, तसेंच जें मन कर्म करण्यानें क्षीण दर्प झालें नसेल, तें मन ज्ञानमार्गांत जीवांस न ऐकतां पतनास कारण होईल, अशा प्रकारें येथे पतन संभावना आहे.

प्रश्न ५८ – बरें उपासना करण्याचा काय हेतु ?

उत्तर ५८ – चित्त एकाग्र होणें, किंवा स्थिर होणें, हाच उपासना करण्याचा हेतु आहे.

प्रश्न ५९ – अंतःकरणांत ईश्वराचें मानस पूजन करून, तेथेंच चित्त लावावें आणि तेथे स्थिर चित्त ज्याचें राहात नाहीं, त्यानें, शास्त्रोक्त ईश्वराची प्रतिमा करून, तेथे चित्तास एकाग्र करावें. हीच उपासना किंवा भक्तियोग होय. परंतु हटयोग हें काय आहे ?

उत्तर ५९ – हटयोग हा, उपासनेंतच गणिलेला आहे, जें चित्त भक्तियोगानें एकाग्र होत नाहीं. त्या चित्ताचा अनिवारपणा मोडण्या साठीं, हटयोग सांगितला आहे

प्रश्न ६० – कर्म आणि उपासना, मुळींच न करितां, किंवा केली तरी अल्प, असें असून, तसे पुरुष महाज्ञानी झालेले आढळतात हें कसें ?

उत्तर ६० – ज्यांची कर्मोपासना पूर्वजन्मीं पूर्ण झाली. किंवा किंचित् अवशेष राहिली,आणि देहास अवसान आलें. तसेच पुरुष उपजतांच,अथवा कांहीं काळानें,अवशिष्ट कर्मोपासना पूर्ण करून,ज्ञानभूमिकेवर आरोहण करतात असें समजावें.

प्रश्न ६१– आपल्या बोलण्या वरून,पूर्वजन्म आहे असें दिसतें ?

उत्तर ६१ – होय आहे.

प्रश्न ६२ – कशावरून,यास काय प्रमाण ?

उत्तर ६२ – यास अनुमान प्रमाण.

प्रश्न ६३ – अनुमान प्रमाण सर्वकाळ सत्यच असतें असें होत नाहीं. यास दृष्टांत, पर्वतावर धूर आहे,म्हणून तेथे अग्नि आहे. हें अनुमान जसें सर्वकाळ सत्य होत नाहीं. त्या प्रमाणें,यास्तव अनुमान प्रमाण,जें आपण म्हणतां,तें माझ्यानें पत्करवत नाहीं ?

उत्तर ६३– पर्वतावर धूर आहे म्हणून तेथे अग्नि आहे,हें अनुमान कदाचित् सत्य नसो,कारण,तेथे धुकें पडण्याचा संभव आहे. परंतु त्या स्वयंपाक घरांत,धूर निघताना दिसतो,त्या अर्थीं येथें अग्नि आहे,हें अनुमान सत्य असून तुला मान्य असावें.

प्रश्न ६४ – हें अनुमान मला मान्य आहे,असेंच तें अनुमान आहे काय?

उत्तर ६४ – होय,तें अनुमान असेंच आहे.

प्रश्न ६५ – तें कसें,हें माझ्या लक्षांत येत नाहीं ?

उत्तर ६५ – सावध होऊन ऐक. दिवसा दिवसाच्या रात्रीं, कोणेकानें केलेलें अध्ययन,जरी तो पुरुष रात्रीं निजला असतां,गाढ झोपेंत तें विसरतो, तरी तो उठला असतां,उत्तर दिवशीं अनधीत होत नाहीं; आणि अनधीत होत नाहीं. यावरून,जसें तें अध्ययन त्यानें पूर्वी केलेलें आहे, तें प्रमाणें सत्य आहे त्या प्रमाणेंच.उपजल्या बरोबर किंवा किंचित् काळ जातांच,जो पुरुष ज्ञानभूमिकेवर आरूढ होतो. तो पूर्वजन्मीं कर्मोपासना केलेला आहे, हें ही म्हणणे निर्विवाद आहे.

प्रश्न ६६– यथार्थ आहे , हें आतां माझ्या लक्षांत चांगलें आलें, बरें,पूर्वजन्म आहे तेव्हां पुनर्जन्म ही असेल कीं कसें?तें मला सांगावें ?

उत्तर ६६ – बाबारे पुनर्जन्म ही आहे.

प्रश्न ६७ — तो कसा! मला असें वाटतें कीं, जो मनुष्य मेला तो मेलाच, त्यास पुनः जन्म नाहीं?

उत्तर ६७ — एकदां जो मनुष्य निजला तो निजलाच, तो जर पुनः जागा होणार नाहीं, तर मेलेला मनुष्यही पुनः जन्मास येणार नाहीं.

प्रश्न ६८ — निजलेल्या मनुष्यास, कोणी हाक मारिली किंवा हलविलें, तर तो जसा जागा होतो, तसा मेलेला मनुष्य, हाक मारण्यानें किंवा हलविण्यानें, कोठे जागा होतो किंवा जिवंत होतो?

उत्तर ६८ — तूर्त मेलेल्या मनुष्याचा विषय राहूंदे, निजलेल्या मनुष्याचाच आधीं विचार पाहूं? निजलेला मनुष्य, कांहीं कार्याच्या उद्देशानें उठविणें असतां, त्यास, बलात्कारानें उठविणारा जसा कोणी प्रत्यक्ष आहे, तसा प्रत्यक्ष उठविणारा नसतां, जर तोच, बलात्कारानें उठविल्या प्रमाणें जागा होतो, तर त्यास उठविणारा कोणी तरी अप्रत्यक्ष आहे, असें अनुमान करणें योग्य आहे.

प्रश्न ६९ — अंमळ विचार करून, वादी म्हणतो, होय, ही गोष्ट सयुक्तिक आहे खरी, पण, यांत पुनर्जन्मा विषयीं, काय सिद्ध झालें?

उत्तर ६९ — पुनर्जन्मा विषयीं यांत हेंच सिद्ध झालें कीं, निजलेल्या मनुष्यास, जागें करणारा प्रत्यक्ष कोणी नसतां, ज्या अप्रत्यक्ष कोणेकानें जागें केलें, तोच गेलेल्यामनुष्यास, जन्मास आणणारा आहे. या कारणास्तव पुनर्जन्म आहे.

प्रश्न ७० — वाः! हें तर चांगल्या रीतीनें सिद्ध झालें, पण हा अप्रत्यक्ष कोकोण आहे, व त्याचें नाव काय?

उत्तर ७० — हा जो कोणी अप्रत्यक्ष आहे, त्याचें नाव कर्म.

प्रश्न ७१ — बरें, मी असें पुसतों कीं, पूर्व जन्म आणि पुनर्जन्म, न मानण्यांत अडचण किंवा अव्यवस्था कोणती?

उत्तर ७१ — अकृताभ्यागम, आणि कृतविप्रणाश अशी उभयरूप अडण किंवा अव्यवस्था, पूर्वजन्म आणि पुनर्जन्म, हे न मानल्यास आहे.

प्रश्न ७२ — अकृताभ्यागम आणि कृतविप्रणाश म्हणजे काय?

उत्तर ७२ — अकृताभ्यागम म्हणजे, कांहीं कर्म न करतां, जन्म आला; आणि कृतविप्रणाश म्हणजे, केलेलें कर्म जन्म न येऊन भोग न होतां चु-

कलें, म्हणजे, उघड अर्थ असा कीं, अपराध न करतां शिक्षा पावला, आणि अपराध केला असून शिक्षा झाली नाहीं, ही अडचण किंवा अव्यवस्था आहे कीं नाहीं? पहा, व हा न्याय कीं अन्याय बरें.

प्रश्न ७३ – ज्ञानी लोक, जन्म मृत्यु नाहीं म्हणतात, तेव्हां आमच्या व त्यांच्या मतांत, फेर तो कोणता?

उत्तर ७३ – ज्ञानी पुरुषांचें तुला नाव घेण्याचें कारण नाहीं, तथापि, तूं पुसलेंस, त्याचें उत्तर देणें भाग आहे म्हणून सांगतों कीं, कोणी एका पुरुषानें, आपल्या अद्भुत शक्तीनें, कोणी दोघा पुरुषांस, एक वृक्ष निर्माण करून दाखवला. त्यांत जो, त्या वृक्षास सत्य मानणारा आहे. त्याला तो वृक्ष उत्पन्न होण्यास पूर्व बीज अंगिकारिलें पाहिजे, व सांप्रतच्या वृक्षाचे बीजा पासून, पुढें दुसरा वृक्ष उत्पन्न होईल, हें ही स्वीकारिलें पाहिजे. तसें न करितां, वृक्ष दिसतो हा मात्र खरा आहे. परंतु हा उत्पन्न होण्याला पूर्व बीज नाहीं, व हल्लीच्या बीजा पासून पुढें वृक्ष होणार नाहीं हें म्हणणें किंवा मानणें जसें सयुक्तिक नसून, मूर्खपणाचें आहे. तसेंच, तुमचें देह सत्यत्व वाद्यांचें म्हणणें मूर्खपणाचें आहे. आतां, जो पुरुष त्या वृक्षास मिथ्याच मानणारा आहे, तो जसा पूर्वोक्तिर बीज मिथ्या मानतो, तें यथा युक्त आहे, तसाच ज्ञानी हा सांप्रतचाच देह मिथ्या मानीत असल्या मुळें, त्यानें पूर्वजन्म व पुनर्जन्म मिथ्या मानिले, हें नीटच आहे, सारांश, ज्ञानी पूर्वजन्म व पुनर्जन्म मिथ्या म्हणतात, तसा प्राप्त झालेला जन्मही मिथ्या म्हणतात; आणि तुम्ही, पूर्वजन्म व पुनर्जन्म मिथ्या म्हणतां, पण हा जन्म सत्य मानतां, हाच ज्ञान्यामध्यें व तुमच्या मध्यें फेर आहे.

प्रश्न ७४ – आम्ही जर, हा सांप्रतचा जन्म मिथ्या आहे, असें मानिलें, तर मग ज्ञानी व आम्ही समान होऊं कीं नाहीं?

उत्तर ७४ – होणार नाहीं.

प्रश्न ७५ – कां बरें?

उत्तर ७५ – तुम्ही हा जन्म मिथ्या असे नुस्ते तोंडानें शब्दच बोलतां म्हणून.

प्रश्न ७६ – नुस्ते शब्द बोलून देह मिथ्या मानिला, तर कां आम्ही ज्ञानी होऊं नये? अथवा नाहीं?

उत्तर ७६ कांहीं कृति न करितां मी जेवलों, मी तृप्त आहे, असे केवळ शब्द बोलणारा, जसा तृप्त होत नाहीं, तसा जन्म नाहीं. मी जन्ममरणातीत आहें, हे शब्द बोलणारास समाधान नाहीं; आणि समाधान नसल्यामुळें तो यथार्थ ज्ञानीही नाहीं.

प्रश्न ७७ — यथार्थ ज्ञान होऊन, वास्तविक समाधान होण्यास, कोणती कृती करावी ?

उत्तर ७७ — श्रोत्रि व ब्रम्हनिष्ठ गुरूस, शरण जाऊन, ते सांगतील त्या प्रमाणें चालावें.

प्रश्न ७८ — श्रोत्रि व ब्रम्हनिष्ठ गुरू म्हणजे काय ?

उत्तर ७८ — श्रोत्रि म्हणजे वेदाध्ययनाचा अधिकारी असून, ब्रम्हसाक्षात्कारवान् तो.

प्रश्न ७९ — यावरून जो द्विज ब्रम्हसाक्षात्कारवान्, तोच गुरु हाच अर्थ कीं नाहीं ?

उत्तर ७९ — होय हाच अर्थ.

प्रश्न ८० — शूद्रास, गुरुत्वाचा अधिकार आहे का नाहीं ?

उत्तर ८० — नाहीं.

प्रश्न ८१ — कांबरें, त्यांस कां नसावा ?

उत्तर ८१ — ज्या काळीं सृष्टि उत्पन्न झाली, त्या काळीं, वर्णभेद नव्हता. सर्व मनुष्यांचा एकच हंस वर्ण असून, सर्वही वेदाध्ययनाचे अधिकारी होते; पुढें निद्रालस्य प्रमादादि दोषामुळें, ज्यानीं, नास्तिक वादानें निषिद्ध कर्म स्वीकारलें, ते बहिष्कृत केले गेले. तथापी, पश्चात्ताप त्यास झाला नाहीं. तेव्हांपासून, त्यांस वर्णव्यवस्थेनुरूप अंत्यवर्ण नाव येऊन, वेदाध्ययन नाहीं तें नाहींच, हेंच त्याचें कारण आहे; आणि म्हणूनच त्यांस गुरुत्वही नाहीं.

प्रश्न ८२ — अंत्य वर्णानें, आतां पश्चात्ताप केला, तर त्यांस पूर्ववत् अधिकार मिळेल कीं नाहीं ?

उत्तर ८२ — मिळणार नाहीं.

प्रश्न ८३ — कांबरें; मला वाटतें मिळावा ?

उत्तर ८३ — राजकीय कार्यावर, कोणी असलेला मोठा कामगार, कार्यांत दक्ष न राहतां, राजसत्ता नाहींशी होण्याजोगें कृत्य करील, त्यास राजा, ज-

न्म प्रतिबंधाची शिक्षा देईल; आणि मग तो जसा पश्चात्ताप करो की प्राण देवो,सुटणार नाहीं,व कार्याधिकारी होणार नाहीं,तसाच, अंत्यवर्णास आतां पूर्ववत् अधिकार मिळणार नाहीं.

**प्रश्न ८४** – बरें,स्त्रियांस वेदाध्ययन व गुरुत्वाधिकार कां नाहीं ?

**उत्तर ८४** – अंत्य वर्णाच्या स्त्रिया तर,आपल्या भर्त्या प्रमाणेंच,जन्म प्रतिबंधात आहेत, ह्मणून त्यां विषयीं,विचार करणें नकोच;आतां द्विजस्त्रियांस अधिकार नाहीं,त्याचें कारण असें आहे कीं, जसा कोणी कामगार,राजानें नियमित करून दिलेल्या वेतनांत,संतुष्ट न राहतां लांच खाऊन अपराधी होतो,किंवा लांच न खातां आरोप येऊन अपराधी दिसतो. तो जसा निरपराधी ठरे पर्यंत,राज कार्यांतून दूर असतो,तसाच न्याय द्विजस्त्रियांचा झाला असल्यामुळें,त्यांसही वेदाध्ययन व गुरुत्वाधिकार नाहीं.

**प्रश्न ८५** – परभू,सोनार,सुतार इत्यादिक कित्येक जाति,आम्ही क्षत्रिय वैश्य आहों,असें म्हणून वेदाध्ययन करितात. त्यां विषयीं ब्राम्हण कांकुर कुरतात ?

**उत्तर ८५** – कारणा वांचून,ब्राम्हण कुरकूर करतील,असें कधींच होणार नाहीं, कारण,जे आपल्या स्त्रियांचा पक्षपात धरीत नाहींत,ते परभू इत्यादिकांस निष्कारण कां बोलतील.

**प्रश्न ८६** – मला वाटतें कीं, ते क्षत्रिय,वैश्य,खास असावेत ?

**उत्तर ८६** – बरें आहे,त्यानीं,आम्ही क्षत्रिय वैश्य आहों,असा पुरावा करून द्यावा म्हणजे झालें.

**प्रश्न ८७** – पुरावा काय करावा,कांहीं लेख दाखवावा कीं काय ?

**उत्तर ८७** – लेख आणि वर्तणूक,अशी दोन दाखवावीं.

**प्रश्न ८८** – लेख तर सांपडणेंच नाहीं,यास कारण,अनेक राजक्रांति व व्यास ऋषीचें भविष्य,आतां राहिली वर्तणूक ती, कशी काय दाखवावी ?

**उत्तर ८८** – वर्तणूक अशी दाखवावी कीं,सांप्रत जी गाई ब्राह्मणास पीडा होत आहे,तिचें निवारण,क्षत्रिय म्हणविणाऱ्या अथवा असणाऱ्या परभूनीं करावें, आणि सोनार सुतार हे वैश्य असल्यास त्यानीं आप आपल्या द्रव्याचा कांहीं भाग काढून अनाथ जे गायी,ब्राम्हण,यांचें अन्नादि दानानें संरक्षण करावें. हाच वर्तणूकीचा पुरावा होय.

प्रश्न ८९ – बरें, ते जर असें म्हणतील कीं, आम्ही मुळीं ब्राम्हणच आहों, क्षत्रिय, वैश्य नाहीं; जर असतों, तर गो ब्राम्हण प्रतिपाळ केला असता, तर मग ?

उत्तर ८९ – त्यांची इच्छा, कारण, कोणी कोणाला नियंताच नाहीं, तेव्हां उगीच बसणें भाग आहे.

प्रश्न ९० – पण, असें त्यानीं केल्यास, त्यांस काहीं भय आहे कीं काय ?

उत्तर ९० – जन्म प्रतिबंधांत ठेवलेला, किंवा कामावरून काढून टाकलेला, मनुष्य, आपलें नाव आणि रूप बदलून, जर पुनः राजकार्यांत मोठ्या पदवींत वागूं लागेल, तर वागो, परंतु ज्या दिवशीं ती गोष्ट उघडकीस येईल, त्या दिवशीं, जी त्यास शिक्षा होईल; तीच परभु, सोनार, सुतार इत्यादिकांस होईल, येवढेंच भय आहे, दुसरें कांहीं नाहीं.

प्रश्न ९१ – बरें, सांप्रतच्या ब्राम्हणास, परभू, सोनार, सुतार, असें जर म्हणत असतील कीं, हे ब्राम्हण मुळींच खरें ब्राम्हण नव्हत तर मग ?

उत्तर ९१ – म्हणोत, परंतु वरिष्ठ अधिकाऱ्याची निंदा व अप्रतिष्ठा करणारास जी शिक्षा होते, ती त्यांस होईल.

प्रश्न ९२ – हा विषय, जसा व्हावा, असा प्रतिपादित झाला. यास्तव आतां हें प्रकरण पुरें करितों !

उत्तर ९२ – बरें आहे, तुझी इच्छा.

प्रश्न ९३ – आतां मी असें पुसतों कीं, मागें, आपण शाहात्तराव्या प्रश्नाच्या उत्तरांत, नुस्ते शब्द बोलण्यानें तृप्ति होत नाहीं, कृति करावी तेव्हांच तृप्ति होते, असें बोलला आहां, यावरून वेदांतांत, उद्योग वाद स्वीकारिला आहे, प्रारब्धवाद स्वीकारला नाहीं, असें दिसतें, आणि वेदांती तर, प्रारब्ध वादी, असें मी आजपर्यंत ऐकून आहें, तेव्हां, यांत वास्तविक कोणतें, हें मला कृपा करून सांगावें ?

उत्तर ९३ – फार उत्तम आहे, तर आतां सावध होऊन ऐक. बाबारे वेदांती जे आहेत, ते विषय निवृत्ती विषयीं उद्योग वादी आहेत, त्याच्या प्रवृत्ती विषयीं उद्योग वादी नाहींत.

प्रश्न ९४ – हें भाषण मला समजलें नाहीं ?

उत्तर ९४ – प्रपंच संबंधी स्फुरणाची प्रवृत्ति, आपल्याठायीं व्हावी, याविषयीं वेदांती उद्योग वादी नाहींत, परंतु त्याचा निरास व्हावा, येविषयीं, म्हण-

जे आपणा पासून, त्याची निवृत्ति व्हावी, याविषयीं वेदांती उद्योग वादी आहेत, असा भाषणाचा अर्थ आहे, असें समज.

**प्रश्न १५**– असें कसें, प्रपंच संबंधी सुख प्राप्त व्हावें, याचा तर उद्योगच केला पाहिजे, निवृत्तीचा उद्योग करणें हें कांहीं बरोबर नाहीं ?

**उत्तर १५** – प्रपंच संबंधी सुख, अल्प किंवा बहुकाळानें नासणारें असल्यामुळें, पुनरपि दुःखच उत्पन्न होतें, म्हणून वेदांती, त्याच्या निवृत्तीचाच उद्योग करितात, प्रवृत्तीचा उद्योग करीत नाहींत, हेंच वास्तविक रीत्या बरोबर आहे, याचा नीट विचार कर, म्हणजे ध्यानांत येईल.

**प्रश्न १६**– हा विचार, मला नूर्त करण्या विषयीं, माझ्या बुद्धींत चांगलें सामर्थ्य नाहीं, परंतु, उघड दृष्टीनें मला इतकेंच वाटतें कीं, प्रपंच संबंधी सुखाचा उद्योग करीत जावा, दुःखाचा मात्र उद्योग करूं नये, म्हणजे झालें ?

**उत्तर १६**– असें नाहीं, ज्यानें प्रपंच सुखाचा उद्योग केला, त्यानें दुःखाचाही उद्योग केलाच असें होतें, कारण, प्रपंच सुखास केव्हांना केव्हां तरी नाश संभावना आहे, म्हणून, सुख नाश झाला कीं, दुःखच उद्भवलें म्हणून समजावें, जसें, दुःख नासलें म्हणजे सुख उद्भवतें त्या प्रमाणें.

**प्रश्न १७** – हें माझ्या मनांत चांगलें भरलें नाहीं, यास्तव उलगडून सांगावें.

**उत्तर १७** – सावध होऊन ऐक. आपण प्रपंच संबंधी सुख प्राप्त व्हावें म्हणून, जो जो कांहीं विषय संपादन करितो; अथवा संपादन करण्यास जातों, त्याचा परिणाम, केव्हांना केव्हां तरी दुःखच असतो, तो कसा म्हणशील तर, आपण मोठ्या कष्टानें, जे द्रव्य, स्त्री, पुत्र, कृषि, राज्य इत्यादि विषय, सुखा करितां संपादन केले अ० करितो, त्यांत द्रव्य चोरानीं नेल्यास, स्त्री पुत्र मरण पावल्यास, कृषि बुडाल्यास, आणि राज्य दुसऱ्या राजानें जिंकल्यास, जें सुख झालेलें असतें त्याचा नाश होऊन पुनः दुःखच होतें. कदाचित् असें न झालेंच तर, हें द्रव्य सुरक्षित कसें राहील, म्हणून जी काळजी लागते, तेणें करून तरी दुःख होतें, स्त्री, वंध्या, व्यभिचारिणी निघेल कीं काय ? म्हणून दुःख, पुत्र कसा निघेल म्हणून दुःख, शेतकी व राज्य यांचें कसें होईल यास्तव दुःख; आणि इतक्याही गोष्टी नच झाल्या, व जन्म पर्यंत यथा सांग सुखच झालें, तर शेवटीं मरण येऊन, तें सुख असतांही, यास तें नाहींसें होऊन जातें. तस्मात्, विषय जनित सुखाचा परिणाम, दुःखरूपच होय, असें पक्कें समज व माण्यानें सु-

रवा साठीं केलेला यत्न,दुरवास कारण झाला कीं नाहीं पहा.

**प्रश्न ९८** – आतांमात्र ही गोष्ट माझ्या ध्यानांत चांगली आली; आणि हाच विचार मनांत आणून, वेदांती, विषय जनित सुखाचा यत्न करीत नाहींत, तर निवृत्तीचाच यत्न करितात, तेणें करून दुःखाची निवृत्ती ऐतीच होत्ये, असेंच तात्पर्य कीं नाहीं ?

**उत्तर ९८** – होय, असेंच यांतील तात्पर्य आहे.

**प्रश्न ९९** – बरें,पण मी असें पुसतों कीं,वेदांती हे प्रारब्ध वादी,कीं, उद्योग वादी ?

**उत्तर ९९** – विषय जनित सुखाच्या प्रवृत्ती विषयीं, वेदांती हे प्रारब्ध वादी असून, तन्निवृत्ती विषयीं,उद्योग वादी आहेत,असें समज.

**प्रश्न १००** – प्रारब्ध आणि उद्योग,यांत काय भेद आहे ?

**उत्तर १००** – प्रारब्धा पासून प्राप्त होणारें जें सुखरूप फळ,तें दुःख परिणामी असल्या मुळें,नाशवंत असतें;आणि उद्योगां पासून प्राप्त होणारें सुख रूप फळ, दुःख परिणामी नसतें, म्हणून, अविनाश असतें, हाच प्रारब्ध आणि उद्योग,यांत भेद आहे.

**प्रश्न १०१** – या वरून प्रपंच्या विषयीं उद्योग करूं नये असें झालें,प्रारब्धानें व्हावयाचें असेल तें होईल,असें जाणून स्वस्थ बसावें, असाच सरशेवटीं सिद्धांत कीं नाहीं ?

**उत्तर १०१** – होय होय! असाच सिद्धांत.

**प्रश्न १०२** – असें जर आहे तर,शरीरास रोग झाली असतां,आम्ही उद्योग करूं नये;आणि वेदांती यानीं तर करूंच नये,परंतु असा अनुभव येत नाहीं; आम्ही अज्ञानी,जसा उद्योग करितों, असेंच ज्ञानी जे वेदांती,तेही उद्योग करितात; तेव्हां बोलावें एक,आणि करावें एक. असा जो प्रतारणारूप दोष, तो वेदांती यांजवर आला,याची वाट काय ?

**उत्तर १०२** – हा दोष,वेदांती यांजवर येत नाहीं, कारण रोग निवृत्ती विषयीं,जो उपाय करावा लागतो. तेंही प्रारब्धच, आहे म्हणून

**प्रश्न १०३** – उपाय न करणें हें तर प्रारब्ध उघडच आहे, पण उपाय करणें,हें प्रारब्ध कसें ?

**उत्तर १०३** – प्रारब्धा वांचून उपाय करण्याची इच्छाच व्हावयाची नाहीं.

या कारणास्तव, उपाय न करण्याची इच्छा जशी प्रारब्ध म्हणतोस, अशीच उपाय करण्याची इच्छा ही प्रारब्धच म्हण अथवा समज.

प्रश्न १०४ – एवंच, इच्छा आणि अनेच्छा असे प्रारब्धांतच दोन भेद आहेत?

उत्तर १०४ – प्रारब्धाचे इच्छा, अनेच्छा आणि परेच्छा असे तीन भेद आहेत.

प्रश्न १०५ – हे तीन भेद, चांगल्या रीतीनें माझ्या ध्यानांत आणून दिल्यास उत्तम होईल ?

उत्तर १०५ – आपणास इच्छा नसतां, जो लाभ अथवा हानि प्राप्त होणें, म्हणजे उदाहरणार्थ सांगतों कीं, आपण मार्गानें चाललों असतां, अकस्मात वृश्चिक दंशरूप अपाय झाला; अथवा द्रव्य घट सांपडला. याचें नाव अनेच्छा प्रारब्ध; आपणास इच्छा उत्पन्न होऊन, लाभ किंवा हानि होणें, याचें नाव इच्छा प्रारब्ध आहे; यास उदाहरण, रोगनिवृत्ती साठीं औषध घेऊन, आरोग्यता रूपलाभ संपादणें, किंवा अपथ्य करून रोगग्रस्ततारूप हानि प्राप्त करून घेणें; आणि परेच्छा प्रारब्ध म्हणजे, आपणास इच्छा व अनेच्छा नसतां, पर म्हणजे अन्याच्या इच्छेनें लाभ हानि होणें, असे हे प्रारब्धाचे तीन भेद. थोडक्यांतच तुझ्या ध्यानांत येण्या सारखे सांगितले आहेत, समजले असल्यास उत्तम झालें, समजले नसतील तर पुनः सांगूं.

प्रश्न १०६ – हे प्रारब्धाचे तीन भेद, माझ्याच उदाहरणावरून माझ्या लक्षांत जसे आले आहेत, तसेच आपल्या पुढें निवेदन करितों; मला इच्छा नसतां, प्रस्तुत जी मला पक्षवाताची विकृति उद्भवली होती, तिचें नाव अनेच्छा प्रारब्ध. पुढें औषधोपचारें करण्याची इच्छा उद्भवली, ती इच्छा प्रारब्ध; आणि घाबरल्यामुळें इच्छा अनेच्छा दोनी नसतां भाऊदाजी यानीं येऊन, जी खटपट करून, ही विकृति दूर केली, तें परेच्छा प्रारब्ध. अशी माझी समजूत झाली आहे ती बरोबर आहे कीं नाहीं हें मला सांगावें ?

उत्तर १०६ – तुझी समजूत निःसंशय बरोबर झाली.

प्रश्न १०७ – मला असें वाटतें कीं, उद्योग आणि इच्छा प्रारब्ध, यांत बरीक, आनां कांहीं भेद नाहीं ?

उत्तर १०७ – भेद वाटत नाहीं, हें तुझें म्हणणें, बाह्यदृष्टीनें खरें आहे, परंतु सूक्ष्म दृष्टीनें, त्यामध्यें असा भेद आहे कीं, इच्छा प्रारब्धानुरूप ज्या ज्या गोष्टी व्हाव्या, असें आपण इच्छून प्रयत्न करितों, त्या त्या, कधीं कधीं सिद्ध होतात व क-

धीं कधीं सिद्ध होत नाहींत, असा इच्छा प्रारब्धाचाठायीं व्यभिचार असून फ—
ळ ही अनवंत असतें; आणि उद्योगास असें व्यभिचारित्व नसून, प्राप्त होणारें
फल अविनाशी असतें, अशा प्रकारें यामध्यें भेद आहे, तो नीट लक्षांत आण.

**प्रश्न १०८** — प्रपंच प्रवृत्ति अथवा संसार प्रवृत्ति, आपल्या ठायीं होऊं नये,
किंवा जी झालेली आहे. तिची निवृत्ति व्हावी, म्हणून जो वेदांती उद्योग करि-
तात, ही तरी इच्छाच नव्हे काय? आणि जर ही इच्छा आहे, तर तिला उद्यो-
ग ह्मणण्यांत कांहीं अर्थ आहे असें मला वाटत नसून, उद्योग आणि इच्छा
प्रारब्ध, हें एकच आहे, असें कां म्हणूं नये?

**उत्तर १०८** — चांगला प्रश्न केलास, तूं जें म्हणतोस तें सर्वांशीं जरी खरें
नाहीं, तरी एकांशानें खरें आहे, कसें म्हणून पुसशील, तर इच्छा शब्द दोहीं
कडे सारखा आहे, त्या दृष्टीनें तुझें म्हणणें खरें आहे; आणि सदसत् त्या श-
ब्द भेद दृष्टीनें, तुझें म्हणणें खरें नाहीं, म्हणजे सदिच्छा, आणि असदिच्छा, अ-
शा दृष्टीनें तें खरें नाहीं.

**प्रश्न १०९** — आतां ही गोष्ट माझ्या चांगली ध्यानांत आली, इच्छा प्रारब्ध
म्हणजे असदिच्छा, व उद्योग म्हणजे सदिच्छा, अर्थात इच्छा प्रारब्ध आणि उ-
द्योग, यांत भेद झाला खरा, परंपण मी असें पुसतों कीं, जशी असदिच्छा कर्मज-
न्य आहे, तशीच सदिच्छाही कर्मजन्यच असतां, हा भेद होण्यास कारण काय?

**उत्तर १०९** — सकाम निःकाम कर्म भेदानें, हा भेद झाला आहे असें समज.

**प्रश्न ११०** — सकाम कर्म आणि निःकाम कर्म ह्मणजे काय?

**उत्तर ११०** — फलाची इच्छा धरून केलेल्या कर्मास, सकाम ह्मणावें; आ-
णि फलेच्छा रहित केलेल्या कर्मास, निःकाम ह्मणावें.

**प्रश्न १११** — जर फलेच्छा नसेल, तर कर्म तरी किंनिमित्त करावें, व तें करण्यां-
त तात्पर्य तरी काय?

**उत्तर १११** — राज निर्बंध पाळणारास बक्षीस जरी नसतें, तरी न पाळणारास
दंड असतो, त्या प्रमाणें वेदोक्त नित्य नैमित्तिक कर्म न करणारास प्रत्यवाय म्ह-
णजे दोष आहे, यास्तव कर्म केलेंच पाहिजे, व तें निःकाम करण्यांत ज्ञानाधिकार प्राप्त
होतो. तें ज्ञान झालें असतां, अविनाश जें मोक्षसुख त्याची प्राप्ती होते, ह्मणून मु-
ळींच कर्म न करण्यांत व केलें तर सकाम करण्यांत अनर्थ प्राप्त होतो, यास्तव निः-
काम कर्म करणें, यांत मोठें तात्पर्य आहे असें चांगलें लक्षांत ठेव.

प्रश्न ११२ – मोक्ष फलाची इच्छा असतां, निःकाम कर्मास फलेच्छा राहित्य कसें संभवतें ?

उत्तर ११२ – फल एक आणि फलग्रहण कर्ता एक. असें द्वैत सत्य असतां, त्या दोषाचा संभव आहे. तसें येथें म्हणजे, अद्वैताच्या ठायीं नाहीं, म्हणून फलेच्छा राहित्य संभवतें.

प्रश्न ११३ – हें माझ्या लक्षांत चांगलें आलें नाहीं ?

उत्तर ११३ – कोणी मनुष्य, आपल्या घरांत बिच्छान्यावर स्वरूप निजला असतां, त्यास असें स्वप्न पडलें कीं, मी अरण्यांत असून, माझे पाठीस महाव्याघ्र लागला आहे, म्हणून तो पळत आहे. तों, तो वाघ इतका जवळ आला कीं, त्यास वाटलें मी आतां खास मरतों, त्या काळीं त्यास अशी इच्छा झाली कीं, मी आपल्या घरांत असतों तर बरें होतें, इतक्यांत जागा झाला, आणि पहातो तर व्याघ्र व अरण्य हें कांहीं नसून तो आपल्या घरांतच आहे, यांत मी घरांत असावें, ही जी इच्छा ती, तो मुळींच घरांत असल्या मुळें, इच्छा त्या शब्द व्यवहारास जशी यथार्थत्वानें पात्र होत नाहीं. त्याच न्यायानें, भ्रमजनित जो संसार, यांत जीवानें, जी मोक्षफळाची इच्छा केली, ती जीव आपण मुळींच अद्वयब्रम्हस्वरूप असल्या मुळें, इच्छा त्या व्यवहारास पात्र होत नाहीं, अशा प्रकारें, येथे इच्छाराहित्य संभवतें.

प्रश्न ११४ – मोक्षफलेच्छेस, इच्छारहितत्व कसें, हें आपण सांगितलेल्या उपपत्ती वरून माझ्या ध्यानांत जसें यावें असें आलें, पण मी असें पुसतों कीं, हा संसार, प्रत्यक्ष दिसत असतां भ्रमरूप कसा म्हणावा ?

उत्तर ११४ – स्वप्न जसें दिसत असून नाहीं; किंवा मृगजळ जसें दिसत असून नाहीं; तसाच, हा संसार दिसत असतांही भ्रमजनित असल्या मुळें नाहीं.

प्रश्न ११५ – पण हा संसार भ्रमजनितच आहे असें कशावरून ?

उत्तर ११५ – यास उत्पत्ति, नाश आहे, यावरून.

प्रश्न ११६ – यास उत्पत्ति नाश वाटतो इतकेंच, परंतु ही सृष्टि अनादि असून प्रवाहरूपानें नित्य आहे, प्रवाहरूपानें नित्य, म्हणजे नदीच्या प्रवाहा प्रमाणें नित्य आहे, असें माझें मत आहे ?

उत्तर ११६ – ही सृष्टि तूं अनादि म्हणतोस, ती आम्हास मान्य आहे, परंतु ही सांत अनादि आहे; आणि प्रवाह रूपानें नित्य जरी ती वाटते, तरी ती, सांत अ-

सल्यामुळें नित्य नाहीं; कारण नदी आरण्याचा संभव जसा आहे, असाच सृष्टी-
स. लयास जाण्याचा संभव आहे.

प्रश्न ११७ – उत्पत्ति नाश असल्या मुळें, दिसणारी सृष्टि असत्य मानावी, हें म-
ला प्रशस्त वाटत नाहीं ?

उत्तर ११७ – ही सृष्टि उत्पन्न झाल्या मुळें, उत्पत्तीच्या पूर्वी नव्हती असें सि-
द्ध होतें; आणि नाश पावत असल्या मुळें, लय झाल्या नंतर ही नाहीं, म्हणून जो प-
दार्थ आदि अंति नाहीं, तो मध्यें ही दिसत असला तरी नाहींच, असा न्याय आहे.
या वरून, ही सृष्टि प्रशस्तपणानें असत्य आहे असेंच समज.

प्रश्न ११८ – पण, अनादि म्हणजे उत्पत्तिरहित असा अर्थ आहेना ?

उत्तर ११८ – हें ही आम्हास इष्टच आहे, व या वरून सृष्टि मुळींच झाली नाहीं,
असें ऐतेंच सिद्ध झालें.

प्रश्न ११९ – ब्रम्हही अनादि आहे, म्हणून तें ही मुळींच नाहीं, असें कां नाहीं ?

उत्तर ११९ – ब्रम्ह अनादि परंतु सत्य आहे; आणि सृष्टि अनादि परंतु असत्य
आहे, जर ब्रम्ह अनादि परंतु असत्य मानिलें, तर अनादि सृष्टि दिसण्याचाच अ-
संभव आहे; यास एकदेशी दृष्टांत. सूर्य जर असत्य मानला, तर मृगजळ दिस-
ण्याचा जसा असंभव त्या प्रमाणें, कदाचित् दोनी सत्य मानावीं. असें जरी स्वी-
कारावें म्हणशील, तरी ही त्यांत कांहीं अर्थ नाहीं, कसा म्हणून पुसशील तर, स-
त्य ब्रम्ह आणि सत्य जग, एकाच जातीचीं असल्यास, सृष्टि मुळींच नसून, तें
सर्व ब्रम्हच असें निर्बाध म्हणणें भाग येईल; आणि सत्य ब्रह्माची जाति निराळी
व सत्य जगनाची जाति निराळी, असा भेद असल्यास, सत्य ब्रह्माहून भिन्न
जातीचें सत्य जग, असत्य असेंच ह्मणावें लागेल, ह्मणून ब्रह्म सत्य असून ज-
ग मिथ्या, हाच निश्चयात्मक सिद्धांत होय.

प्रश्न १२० – सृष्टि मिथ्यात्वाचा हा परम सिद्धांत ऐकून, वादी आपला पक्ष खं-
डित झाल्यानें खिन्न होतो, परंतु सत्य वस्तूची स्थिति चांगल्या प्रकारें सिद्ध झा-
ली ह्मणून, आनंद पावून मनांत ह्मणतो, अशीं निःसंशय उत्तरें देणारा पुरुष म-
ला आजपर्यंत कोणीच भेटला नव्हता काय करावें ? पावसाळा जवळ आल्या
मुळें वाईस लवकर जाणें आहे ह्मणून उपाय नाहीं, नाहीं तर याच्या समाग-
मास मी खचित राहिलों असतों, असें म्हणून कुंठित झाल्या मुळें जी स्तब्धता
आली होती, तिचें निवारण करून, प्रश्न करितो. महाराज, आपलें भाषण ऐ-

रून मी अगदीं निःसंशय झालों, आतां मी असें पुसतों कीं, ज्ञानी व अज्ञानी यांमध्यें भेद काय आहे ?

उत्तर १२० – असदिच्छारूप जें प्रारब्ध तें, अनेच्छा व परेच्छा यांसहित, अज्ञान्याप्रमाणेंच ज्ञान्याच्या ठायीं असून, अज्ञान्या प्रमाणें, ज्ञान्यास त्याचा अभिनिवेष नसतो; आणि सदिच्छा जी अज्ञान्यास नसते, ती याच्या ठायीं असते, असा प्रकृत प्रसंगानें ज्ञानी व अज्ञानी यांत भेद आहे.

प्रश्न १२१ – आरंभिलेल्या प्रारब्ध वादाचें व उद्योग वादाचें स्मरण करून म्हणतो, एवंच, प्रपंच प्रवृत्ती विषयीं उद्योग करणारा अज्ञानी, निवृत्ती विषयीं उद्योग करणारा ज्ञानी, आणि निवृत्तीचा जो उद्योग, त्याचेंच नाव वास्तविक पुरुषार्थ, असेंच कीं नाहीं ?

उत्तर १२१ – होय होय बाबा असेंच.

प्रश्न १२२ – महाराज, मला आतां एक दोन प्रकरणें पुसायाचीं आहेत, तीं पुसण्याची आज्ञा व्हावी. कारण, आमच्या सुधारलेल्या मंडळींत तीं चालू करण्याची फार उत्सुकता असून, मीही तदंतःपातीच आहें, या मुळें अवश्यकता आहे; आणि आपण सत्यवादी निःपक्षपाती ब्रह्मनिष्ठ आहां, तेव्हां तथ्य असेल तेंच सांगाल, असें जाणून पुसतों, यास्तव काय आज्ञा आहे ?

उत्तर १२२ – खुशाल पूस आम्हाकडून ना नाहीं, जें तथ्य असेल तेंच सांगूं ?

प्रश्न १२३ – उत्तम मिष्टान्न पुढें वाढिलेलें सोडून, निंब खात बसणें, हा जसा वेडेपणा, तसेंच मी सांप्रत करीत आहें, ये विषयींमात्र मला क्षमा असावी.?

उत्तर १२३ – असें असेल तर अनुचित खरेंच, परंतु मनांत आलेलें पुसून घेऊन, संशय रहित हो, अनुमान करूं नको, तुला क्षमा आहे.

प्रश्न १२४ – मोक्षपुरुषार्थ साधायास अधिकारी देह कोणता ?

उत्तर १२४ – मनुष्य देह.

प्रश्न १२५ – मनुष्यांत जशी पुरुषांची गणना आहे, अशी स्त्रियांची आहे कीं नाहीं ?

उत्तर १२५ – आहे

प्रश्न १२६ – जर पुरुषां प्रमाणें, स्त्रियांची गणना मनुष्यांत आहे, तर स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीच्याच योग्यतेच्या असतील ?

उत्तर १२६ – नाहींत, कारण त्यांस पुरुषां प्रमाणें स्वातंत्र्य नाहीं.

प्रश्न १२७ – स्त्रियांस स्वातंत्र्य पूर्वी पासूनच नाहीं कीं आतां अलीकडे ना-

हींमें झालें ?

**उत्तर १२७** – कृतादिक पूर्व तीन युगांपासुनच नाहीं, त्यांत कलियुगांत विशेषेंच करून नाहींसें झालें.

**प्रश्न १२८** – स्त्रियांस कलियुगामध्यें, विशेषेंकरून स्वातंत्र्य नसण्यास काय कारण ?

**उत्तर १२८** – लोकानीं असुक रीतीनें वागावें, म्हणून जे राजनिर्बंध असतात, त्यांत, धूर्त लोक बुद्धिबलानें कांहीं तरी सवडी काढितात, व यथेष्टाचरणास प्रवृत्त होतात. हें पाहून, राजा जसे नवे नियम करून, त्या लोकांस अधिक प्रतिबंध करितो, त्या प्रमाणें वेदरूप निर्बंधाचे अनेक अर्थ इच्छे प्रमाणें करून, स्त्रिया सवडी काढूं लागल्या म्हणून, किंवा काढतील म्हणून, ईश्वरानें शास्त्ररूप नवे निर्बंध करून, त्यांस अधिक प्रतिबंध केल्यामुळें, कलींत विशेषें करून त्याना स्वातंत्र्य नाहींसें झालें.

**प्रश्न १२९** – ही गोष्ट स्त्रियां प्रमाणें धूर्त पुरुषांसही लागू असेलच ?

**उत्तर १२९** – स्वातंत्र्य विषय शिवाय करून, धूर्त पुरुषांसही, ही गोष्ट स्त्रियां प्रमाणेंच लागू आहे.

**प्रश्न १३०** – बरें; स्त्रिया पुरुषांहून किती कमी आहेत ?

**उत्तर १३०** – वेदानें, स्त्रिया पुरुषाच्या अर्ध्या योग्यतेच्या आहेत, असें उपलक्षण केलें आहे, त्या वरून इतकेंच समजावें कीं, त्या पुरुषांहून योग्यतेनें व अधिकारानें व कांहींशा उण्या आहेत, हें अनुभवानें निःसंशय खरें आहे.

**प्रश्न १३१** – माझा संशय जात नाहीं, मला अजून असें वाटतें कीं, स्त्री पुरुषांची योग्यता सारखीच असावी ?

**उत्तर १३१** – चौऱ्यांशिवाव्या प्रश्नाच्या उत्तरांत लिहिल्या प्रमाणें अंत्यवर्णाच्या स्त्रिया कदाचित् आपल्या भर्त्यांच्या बरोबर होतील तर होतील. ब्राम्हण क्षत्रिय वैश्य यांच्या स्त्रिया कधींच स्वस्व भर्त्या बरोबर होणार नाहींत.

**प्रश्न १३२** – मला प्रश्नांत आड प्रश्न असा सुचला आहे कीं, अंत्यवर्ण जन्म प्रतिबंधांतच आहे असें कशावरून, त्यांनीं अधिकाराचा राजीनामा दिला असें कां नसेल ?

**उत्तर १३२** – राजकार्यांत वागणारा मनुष्य, जो कोणी कांहीं अंगावर दोष नसतां आपखुषीनें अधिकार सोडतो त्यानेंच राजीनामा दिला असें म्हणणें योग्य

आहे,व हा राजीनामा सन्यास घेणाराशिवाय इतरांस देण्यास योग्यता नाहीं, तशीच सन्यास घेण्याचीही योग्यता ब्राम्हणा वांचून इतरांस नाहीं, कारण क्षत्रिय आणि वैश्य हे जे वेदाधिकारी आहेत, त्यांस देखील सन्यास घेण्यासच मुळीं अधिकार नाहीं जर,तर अंत्यवर्णानें राजीनामा दिला, हें म्हणणें अगदीं वेडेपणाचें आहे.

**प्रश्न १३३** – बरें ब्राम्हणादि तीन वर्णाच्या स्त्रिया,चोऱ्यांयशिवाच्या उत्तरांत सांगितल्या प्रमाणें,राजकार्यविरून दूर केल्या असतां,त्या वैदिक कर्मांत वागताना आढळतात, हें कसें ?

**उत्तर १३३** – लांच खाल्ल्याचा आरोप ज्यांवर आला होता. तो दोष त्यांवरील नाहींसा झाल्यामुळें,तेवढ्याच स्त्रिया वैदिक मार्गांत वागतात असें समज.

**प्रश्न १३४** – बरें जन्म प्रतिबंध अंत्यवर्णास होण्यास काय कारण झालें ?

**उत्तर १३४** – प्रथम कारण असें कीं, राजानें नियमित करून दिलेल्या वेतनांत, त्यांनीं संतुष्ट न राहतां, अनियमित विषय सेवन लांच खाल्ला. दुसरें फार मोठें कारण असें कीं, त्यांनीं राजसत्ता नाहींशी करण्यास आरंभ केला, म्हणजे नास्तिक वादाचें बंड केलें,या दोन अपराधामुळें,जे या अपराधांत सांपडले,त्यांस जन्म प्रतिबंध झाला.

**प्रश्न १३५** – अंत्यवर्णास वेदाधिकार व गुरुत्वाधिकार,आतां प्राप्त होणें नाहीं हें असो, परंतु वर्ण व्यवस्था झाल्यावर,जो जो अधिकार ज्यास ज्यास दिला. तो तो लांच न खातां व नास्तिक वादाचें बंड ज्यांच्या वडिलांनीं केलें,त्या प्रमाणें त्यांनीं न करतां,आप आपलीं कामें बरोबर बजाऊन,राजाची प्रसन्नता करून घेऊन,घर बसल्या राजभांडारांतून वेतनाची नेमणूक सन्मान पूर्वक झालेली असून,तिचा उपभोग करणारे ,असे कोणी आहेत कीं, नाहीत,व त्यांत अंत्यवर्ण आहे कीं नाहीं ?

**उत्तर १३५** – जे जे लोक,तुझ्या प्रश्ना प्रमाणें वागून,स्वप्रकाश हृदापरोक्ष साक्षात्कारास पावले आहेत,ते सर्व तेवढेच मात्र,सन्मान पूर्वक नेमणूकीचा उपभोग घेणारे आहेत व त्यांत अंत्यवर्णासहित सर्व वर्णांचे तसेच यथान्याय सर्व आश्रमाचेही मनुष्यमात्र आहेत,परंतु असे लोक फार थोडे आहेत.

**प्रश्न १३६** – सिंहावलोकनें करून,वादी जोनो प्रकरण स्मरणांत आणून म्हणतो, एवंच, स्त्रिया त्या परतन्त्र होत, कारण जरी कोणेक परतंत्रस्त्री, स्वतंत्र व्हावयास जाईल किंवा इच्छील,तरी ती स्वतंत्र राहूं शकणार नाहीं, कोणाच्या ना कोणा-

च्या तरी तिला तंत्रांत राहावें लागेल. किंवा बलात्कारानें तरी कोणी आपल्या तंत्रानें तिला वागवील, असेंच कीं नाहीं ?

उत्तर १३६ — होय असेंच.

प्रश्न १३७ — बरें, आतां पुरुष ज्या अर्थी स्वतंत्र आहेत, त्या अर्थी त्यानीं, पाहिजेत तितक्या, स्त्रिया कराव्या, तशींच हवीं तितकीं आंगवस्त्रें बाळगावीं, अशी सरळ मोकळीकच आहे. किंवा यास कांहीं निर्बंध आहे ?

उत्तर १३७ — आंगवस्त्रें बाळगण्याची मुळींच कोणास मोकळीक नाहीं. आतां स्त्रिया करण्या विषयीं असा निर्बंध आहे कीं, पुरुषानें, यथान्याय आपल्या कुलशीला दिकांशी जी समान स्त्री, तिच्याशीं लग्न करावें. नंतर इहपरलोक जयाची इच्छा जस जशी असेल, ती प्रमाणें कुदिनादिक वर्जून, पुत्रार्थ ऋतुकालीं तिशीं समागम करावा. मग एक पुत्राची इच्छा असो कीं, एका पासून दाहा पर्यंत असो, पुढें जर असें होईल कीं, ती स्त्री पुत्र न होतां मरण पावेल. अथवा जिवंत असून वंध्या असेल. तर इच्छा असेल तितके पुत्र होण्यास, आणखी पुनः लग्नाची स्त्री करावी. तिचेंही वर प्रमाणेंच होईल, किंवा तिला आपले इच्छे इतके पुत्र न होतील, तर जितक्या पुत्रांची इच्छा आहे, तितके पुत्र होत पर्यंत, लग्न विधीनें आणखी कित्येक स्त्रिया कराव्या. असा निर्बंध आहे.

प्रश्न १३८ — दाहा पुत्रांची इच्छा नसून, एकच पुत्राची इच्छा असेल, अगर मुळींच इच्छा नसेल, तर कसें करावें. ?

उत्तर १३८ — एकच पुत्राची इच्छा असेल तर तेवढा होतांच पुनः स्त्रीशीं संमागम करूं नये; आणि जर मुळींच इच्छा नसेल, तर लग्नच करूं नये, सारांश असा कीं, स्त्री करायाची ती पुत्रार्थ करायाची, रतिसुखार्थ करायाची नाहीं, असा नियम समजावा.

प्रश्न १३९ — वेदानें अशा सवडी कशासाठीं सांगितल्या, या वरून मला असें वाटतें कीं, वेदाच्याच मनांतून जीवांची विषय सेवन वृद्धि करावी असें आहे ?

उत्तर १३९ — असें नाहीं, याविषयीं उदाहरण ऐक, कोणी एका सभाग्य पुरुषाचा पुत्र, अनिवारपणानें, जो नदींच्या कांठीं, टाक पाण्यांत उड्या, वड झाडावर अशा क्रीडा, ज्यामध्यें मरणादि भीतीचा संभव आहे, त्या करायास लागला असतां, जसा तो भाग्यवान् व महाज्ञानी पिता, त्या पुत्रास, घरांत खेळत जा. तुला

पर्यंत काय पाहिजे तें देईन, असें म्हणून आज्ञा देतो, ती आज्ञा जशी स्थायिक न-व्हे परंतु पुत्राचा बाहेर जाण्याचा छंद उणा करण्यास उपयोगी आहे, ती आज्ञा स्थायिक कां नव्हे म्हणशील तर, त्या पुत्रानें सतत घरांत खेळतच राहावें अशी पित्याची इच्छा नसून त्यानें विद्या संपादून प्रतिष्ठित व्हावें, एतद्विषयींची वास्तविक आहे, याच प्रमाणें, हे जीव अनिवार विषय सेवन करतील, तें त्यानीं न-करावें म्हणून लग्नादिकांच्या क्रमयुक्त आज्ञा, वेदानें, अनिवार विषय निवृत्ती विषयीं दिल्या इतकेंच, परंतु ह्या त्यानीं सतत करीतच राहावें, असा वेदाचा हेतु नाहीं, तर वेदाचा मुख्य हेतु, जीवानीं ब्रम्हविद्या संपादून, जन्म मरण रहित जी प्रतिष्ठा, तीप्रत पावावें असा आहे, यास्तव, जीवांचा विषय वाढवावा, असें वेदाच्या मनांत नाहीं, असाच सिद्धांत लक्षांत ठेव.

**प्रश्न १४०** – यावरून, अत्यंत अप्राप्त वस्तु जीवास प्राप्त व्हावी; आणि नित्य प्राप्ताची निवृत्ति व्हावी; यास्तव वेदानें, दाहा पुत्रांची प्रथम आज्ञा अथवा नियम करून, क्रमानें विषयाचा संकोच करण्या जोगी, एक पुत्रा पर्यंतही आज्ञा दिली, पाणिग्रहणाचा निर्बंध करून, कुदिनादि वर्जून, ऋतुकालींच स्त्री समागम करावा म्हणून सांगितलें, तस्मात् विषयांची निवृत्ति करीत करीत जाणारास, नियम भंगाचा दोष नाहीं, परंतु प्रवृत्ति करणारास, नियम न पाळल्यांत दोष आहे, जसा घरांत खेळणारा पुत्र, तो खेळ सोडून अध्ययन करीत बसल्यास अपराधी होत नाहीं, पण घरांतील खेळ सोडून पुनः बाहेर गेल्यास मात्र अपराधी होईल. त्या प्रमाणें, हेंच यांतील तात्पर्य कीं नाहीं ?

**उत्तर १४०** – होय होय. हेंच तात्पर्य.

**प्रश्न १४१** – या प्रमाणेंच मद्य मांसास्वादनाचा ही निर्बंध असेल ?

**उत्तर १४१** – यज्ञादिकांचे नियमद्वारा, मद्य मांसा स्वादनाचाही असाच निर्बंध आहे.

**प्रश्न १४२** – बरें पूजा रूप यज्ञ विधीनें, सांप्रत जे कोणी मद्य मांसा स्वाद न करतात, ते सदोष कीं निर्दोष, सदोष ह्मणावे तर, विस्तृत किंवा तांत्रिक असा नियम आहे, जसा सभाग्य पुरुषाच्या पुत्राचा विस्तृत अथवा संकोच रूप खेळ आहे त्या प्रमाणें, बरें निर्दोष ह्मणावें, तर निंदा आढळते तेव्हां हें कसें ?

**उत्तर १४२** – कलियुगामध्यें, सौत्रामण्यादिक यज्ञ करूंच नयेत, असा निर्बंध असेल तर पूजा यज्ञाचाही निर्बंध असावा हें युक्त आहे आणि सदा करावे

परंतु मद्यमांसास्वादन मात्र करूंये असें असेल, तर पूजा यज्ञ करून मद्यमांसा स्वादन केल्यास दोष आहे.

प्रश्न १४३ – यज्ञ केल्यावर, हुतशेष व पूजा केल्यावर देवता प्रसाद अगत्य घेतलाच पाहिजे असें आहे, न घेतल्यास अनादर केलासा होईल, तेव्हां याचा परिहार कसा?

उत्तर १४३ – महाशिवरात्र्यादि दिवशीं पितृतिथि आल्यास श्राद्ध करावें, आणि पितृशेष प्रसादाचें अवघ्राण न करून जसें उपवास व्रत मोडूं नये. व मोडत नसून पितरांचा ही अनादर होत नाहीं, त्या प्रमाणेंच, हुत शेष आणि देवता प्रसाद यांचें अवघ्राण न केलें असतां, विषयसेवन दृष्टि न करणें एतद्रूप जें व्रत, त्याचा भंग न होतां, यज्ञदेवतेचाही अनादर होत नाहीं.

प्रश्न १४४ – मद्य मांसास्वादन करणेंच जर नाहीं, तर मग यज्ञादिक तरी कशासाठीं करावे?

उत्तर १४४ – शिवरात्र्यादि दिवशीं, भोजन करणें नाहीं, ह्मणून श्राद्धच करूं नये, हें जसें अनुचित व पापकारक होय, त्याच प्रमाणें यज्ञादिक न केल्यास, द्रव्यवानादिकांस दोषावह आहे.

प्रश्न १४५ – बरें आमच्या सुधारलेल्या मंडळींत, हे सर्व नियम मोडून, कित्येक मद्यपान करणारे आहेत, यांस काय गति होईल?

उत्तर १४५ – वेदाचा नियम मोडल्या मुळें, त्यांस निषिद्धाचरण घडलें, यास्तव त्यांस नरकास जावें लागेल, कारण, विधीनें चालणारास जशी स्वर्ग प्राप्ति आहे, तशी निषिद्धाचरण करणारास नरक प्राप्ति आहे.

प्रश्न १४६ – त्यांच्या मनांत स्वर्ग नरक गति व त्या देणारा ईश्वर मुळींच नाहीं, असें असेल तर मग?

उत्तर १४६ – बरें आहे, नसेल तर राहिले.

प्रश्न १४७ – नाहीं पण, असें ह्मटल्यास कांहीं अडचण आहे कीं काय?

उत्तर १४७ – तूं पुसतोसच, म्हणून सांगतों कीं, नास्तिक जे ईश्वर नाहीं म्हणून मानतात, त्यांसही वेदाच्या विधी प्रमाणें आस्तिका प्रमाणेंच चालणें आवश्यक आहे, का ह्मणशील तर, नास्तिकानीं ईश्वर नाहीं असें पाहिलेलें नाहीं, नाहीं असें ह्मणणें हें अनुमानच आहे, यास्तव नास्तिकानीं वेदविधी प्रमाणेंच चालावें, मरणा नंतर, जर आस्तिकांच्या म्हणण्या प्रमाणें ईश्वर अ-

सला आणि त्याणें पुसलें, तर नियमा प्रमाणें आपण चालतों असल्यामुळें, नरकास जाण्याचें भय नाहीं. कदाचित् नास्तिक मतां प्रमाणें ईश्वर नसला, तर पुसणारा ईश्वरच नसल्यामुळें, तूं वेदाच्या नियमां प्रमाणें कां चाललांस, असें कोणी पुसत नाहीं, म्हणून ही भय नाहीं, सारांश नियमा प्रमाणें चालण्यांत ईश्वर असला, तरी भय नाहीं, नसला तरी भय नाहीं, आणि नियमा प्रमाणें न चालण्यांत, ईश्वर नसला, तर मात्र भय नाहीं; पण जर असला, तर भय आहे, येवढीच अडचण, दुसरें कांहीं नाहीं.

**प्रश्न १४८** – हें उत्तर ऐकून, वादी भयभीत होतो, आणि आपल्या मनाशीं ह्मणतो, हा उत्तर देणारा पुरुष माझ्या बालमित्राच्या रूपानें, कोणी सिद्ध पुरुष तर आला नसेल, असें म्हणून खुर्चीवरून उठून, चरणी मस्तक ठेवून, पुढें हात जोडून उभा राहातों, आणि त्राहि त्राहि अपराध क्षमा करा, अपराध क्षमा करा, असे शब्द तोंडानें कंठ दाटून आला असतांही बोलून रडूं लागतो, नंतर पुनः नमस्कार करून म्हणतो, हे गुरुराज, मी क्रुधारलेल्या पदत मूर्खांच्या संगतीनें, संशय समुद्रांत बुडत असतां, तूं मला तारक भेटलास, त्यामुळें मी तरलों, नाहीं तर बुडालो होतों, धन्य माझें भाग्य कीं, मला आपले चरणां दृष्टीस पडले, असें म्हणून, पुनः घट्ट पाय धरून, तसाच चरणावर पडला असतांच बोलतों कीं, आतां मला कृतार्थ करा. किंवा कृतार्थ झालास असें स्वमुखानें ह्मणा. तरच मी उठेन. नाहीं तर, आतां देह तरी ठेवून कर्तव्य काय ?

**उत्तर १४८** – महादेवा, भिऊंनको, भिऊं नको, तूं कृतार्थ आहेस, असें ह्मणून त्यास स्वहस्तानें उठवून आलिंगन देऊन, त्याचे नेत्र पुसतात, आणि बोलतात कीं, बोल. तुझे आणखी काय प्रश्न आहेत ते, संकोच धरून राहाशील तर, अशी वेळ पुनः येणार नाहीं. यास्तव सत्वर बोल.

**प्रश्न १४९** – महाराज, हे मजजवळ जे गृहस्थ बसले आहेत, त्यांच्या मनांतून वेदा विषयीं विशेष पुसायाचें आहे, परंतु विवाह प्रकरण कडेस लावून, मग तें पुसेन. प्रस्तुत मी असें पुसतों कीं, स्त्रियांच्या विवाहाचा नियम कसा काय आहे ?

**उत्तर १४९** – स्त्रियांस विषयनिवृत्तीवर लक्ष देऊन, परपुरुष समागम तर मुळींच वर्ज्य असून, कलियुगामध्यें विशेष परतंत्रता असल्यामुळें, त्यांनीं आपल्या कुलशीलादिकांशीं समान, अशा पतीशीं, यथान्याय व एकवार मा-

त्र विवाह् करावा. या व्यतिरिक्त पुनः विवाह् करूंनये, असा तीन [illegible] न्- यांविषयीं नियम आहे.

**प्रश्न १५०** — पुरुषानें पुत्रकाम असतां, जर स्त्री मरण पावेल. किंवा जिवं- त असून वंध्या असेल तर, आपणवी कित्येक स्त्रिया जशा लग्न करून वरा- व्या, तसाच पुत्रकाम स्त्रियांस असेल तर ?

**उत्तर १५०** — स्त्रियांस पुत्रकाम असून, त्यांचा पति हरवेल मरण पावेल, सन्यासी होईल, नपुंसक निघेल, किंवा बाटेल, तरी त्यांस अन्यपति वरण्यास अधिकार नाहीं.

**प्रश्न १५१** — पण अशी चाल पूर्वीं होती ?

**उत्तर १५१** — पूर्वीं होती ह्मणजे कृतादि तीन युगांत होती, कलियुगांत नव्हती, आणि दुसरें असें कीं, पूर्व युगांत जरी, स्त्रीस पुत्रकाम असतां चाल होती, तरी पुनर्विवाहाची नव्हती. केवळ तिनें पुत्रार्थच, आपले नियंते जे श्रो- णी, त्यांच्या आज्ञेनें किंवा नियंते नसल्यास स्वतः दिराकडे अथवा कुलगुरु इत्यादिक योग्य पुरुषाकडे जावें. अशी चाल होती, यांत तूं असें पाहा कीं, नि- यंते नसतां देखील, पूर्व युगांत स्त्रियांस पुत्रार्थ परपुरुषाकडे जाण्यास मोक- ळीक होती; आणि कलींत नाहीं, अर्थात् पूर्वींच्या स्त्रिया परम विचारवान् हो- त्या, तशा आतां नाहींत, म्हणून त्यांस विशेष निर्बंध आहे, असें समज.

**प्रश्न १५२** — पूर्वीं स्त्रियांस पुनर्विवाह नव्हता असें कशावरून ?

**उत्तर १५२** — उदाहरण नाहीं यावरून.

**प्रश्न १५३** — उदाहरण नसेल म्हणून तरी कशावरून

**उत्तर १५३** — पुरुषा बरोबरीचा अधिकार त्यांस एकशें तिसाव्या उत्तराप्र माणें पूर्वींच नव्हता अशावरून.

**प्रश्न १५४** — पुरुष मनुष्य, आणि स्त्रीही मनुष्य असें असतां, तीस पुरु- षा बरोबर अधिकार नसणें, हा तर स्त्रियांवर केवळ जुलूम आहे, असें म- ला वाटतें ?

**उत्तर १५४** — वरिष्ठ अधिकारी मनुष्य आणि कनिष्ठ अधिकारीही मनुष्य असतां, वरिष्ठास जे कोणांस दंड शिक्षा इत्यादि कार्य करण्याचा अधिकार आहे, तो कनिष्ठास नाहीं, हा जर जुलूम होऊंशकेल, तर तोही जु- लूम होईल.

**प्रश्न १५५** – हा जुलूम नाहीं, हा कायद्याचा ठरावच असल्यामुळें, ती नीति आहे ?

**उत्तर १५५** – तर मग, तुझ्याच बोलण्यावरून, पुरुषापेक्षां स्त्रियांचा अधिकार, वेदशास्त्राच्या ठरावानुरूपच कमी असल्यामुळें, हीही नीतिच आहे, अरे भ्रम प्रमादादि दोषानें युक्त जे मनुष्य त्याच्या ठरावास देखील तुझ्यानें अनीति ह्मणवत नाहीं, तो तूं, तद्दोष रहित जो ईश्वर, त्याच्या नियमास अनीति कसा ह्मणशील, किंवा तुझ्यानें कसें म्हणवेल, व ह्मणतांही कामास नये, कारण शिक्षा होईल नास्तिक मता प्रमाणें म्हटल्यास काय बाध आहे असेंही जरी मनांत आणलेंस तरीही म्हणतां कामास ये येविषयीं एकशेंसत्तेचाळिसाव्या उत्तराचें स्मरण ठेव.

**प्रश्न १५६** – होय होय, खरी गोष्ट त्याचें मला पक्कें स्मरण आहे, पण मला भ्रांतीनें वारंवार असें वाटतें कीं, हे ईश्वरी नियम कांहींसे गैरसोईचे असावेत. यास काय करावें ?

**उत्तर १५६** – सोय आणि गैरसोय इकडेसच जर पाहूं लागलें, तर, आपली बहीण दुसऱ्या पुरुषास द्यावी, आणि दुसऱ्याची बहीण आपण वरावी, किंवा आपलें लग्न झालें नाहीं, आणि आई जर विधवा असेल, अथवा कुटुंब निवर्तलें, आणि कन्याच जर उपवर असेल तर, बहिणीशीं, आईशीं किंवा कन्येशीं लग्न करण्यांत द्राविडी प्राणायाम म्हणजे गैर सोय नसून पुष्कळ सोय आहे मग असेंच कां न करावें.

**प्रश्न १५७** – अंगावर कांटा उभा राहून ह्मणतो, छी छी, असें करणें तर काय, पण मनांत आणणें हा देखील अन्याय आहे, यास्तव मी गैरसोय असें जें बोललों, याची मला क्षमा असावी. जी गोष्ट थोर थोरानीं निषेधली, ती निषिद्धच असें मी समजतों ?

**उत्तर १५७** – थोर थोरानीं जी गोष्ट निषेधिली, ती ईश्वरी नियमावरूनच निषेधिली, या कारणास्तव, नियम आहे तसेंच चालावें, त्यांत हें असेंच कां असावें, असा तर्क करणें अथवा करीत बसणें युक्त नाहीं, व सोय गैरसोय ह्मणणेंही युक्त नाहीं, हें तूं समजलास, येणें करून मला फार आनंद झाला. पुढें काय पुसतोस, तें बोल.

**प्रश्न १५८** – पुरुष स्वतंत्र असल्यामुळें त्याला पुत्र काम असतां त्यानें

विवाह विधीनें आणखी स्त्रिया वराव्या ; परंतु स्त्रिया परतंत्र असल्या मुळें, त्यांस विवाह विधीनें अन्य पति वरण्यास अधिकार नाहीं; आणि पुत्र काम जर आहे, तर कसें करावें ?

**उत्तर १५८** – दत्तपुत्र घ्यावा.

**प्रश्न १५९** – पुरुषानें ही, असाच दत्तपुत्र घेतला, तर काय अडचण आहे, व त्यांत कांहीं अडचण नसून विषय सेवन वृद्धि ही ही, उणीच होणार आहे, तेव्हां हें तर चांगलें, असें मला वाटतें ?

**उत्तर १५९.** – तूं ह्मणतोस ही गोष्ट खरी आहे, व असें करणें उत्तमही होय, परंतु औरस पुत्राची योग्यता व अधिकार दत्त पुत्राहून अधिक आहे, असें जाणून व पुरुषास स्वतंत्रते मुळें आज्ञा आहे म्हणून, होईल तेथ पर्यंत औरस पुत्राचाच त्यानें यत्न करावा, नाहीं तर निदान दत्तक आहेच.

**प्रश्न १६०** – पुरुषानें विवाह विधीनें वरलेल्या ज्या स्त्रिया, त्यामध्यें जिला त्या पुरुषा पासून पुत्र होईल, तो जसा औरसच, तसा पूर्वयुगांत ज्या स्त्रिया दीर इत्यादिकां पासून जो पुत्र उत्पन्न करून घेत होत्या, तोही औरसच मानला जात होता, कीं कसे ?

**उत्तर १६०** – नाहीं, तो औरस मानला जात नव्हता, त्यास क्षेत्रज पुत्र असें ह्मणत असत.

**प्रश्न १६१** – एकवार ज्या स्त्रीचा ज्याच्याशीं विवाह झाला, तिनें तो पुरुष नष्ट झाला इत्यादिकारणानें सोडून पुनर्विवाह कां करूं नये, हें माझ्या लक्षांत अजून चांगलें भरत नाहीं ?

**उत्तर १६१** – जी नदी ज्या गोत्रा पासून उत्पन्न झाली, ती एकवार त्याला सोडून निघाली, ह्मणजे ज्या पूर्वादि कोणेक समुद्रास जाऊन मिळते, ती त्या पासून जशी पुनः परतत नाहींच, तोच न्याय पित्याचे गोत्र एकवार सुटल्या नंतर स्त्रियां विषयीं आहे.

**प्रश्न १६२** – आतां लक्षांत आलें, नदीला जसा समुद्राचा त्याग नाहीं; तसाच स्त्रियांसही एकवार झालेल्या पतीचा कसाही प्रसंग असो, त्याग नाहीं, असेंचना ?

**उत्तर १६२** – होय असेंच.

प्रश्न १६३ — जी नदी पूर्व समुद्रास एकवार जाऊन, मिळाली म्हणजे त्याच्या गोत्रांत गेली ती जशी पुनः पश्चिम समुद्रास जाणारच नाहीं, तशी जी स्त्री एकवार ज्या पतीच्या गोत्रांत गेली, ती पुनः अन्य पतीच्या गोत्रांत जायचीच नाहीं, असाच निर्णयना ?

उत्तर १६३ — असाच निर्णय.

प्रश्न १६४ — हा जो आपण नदी समुद्राचा दृष्टांत सांगितला, तो फार उत्तम असून, त्या मध्यें सर्वच निर्णय झाला, ह्मणजे, एका समुद्रास जशा अनेक नद्या मिळतात, तशा एका पुरुषास अनेक स्त्रिया होऊं शकतात, व नदी जशी एकवार ज्या समुद्रास मिळाली ती जशी परतून दुसऱ्या समुद्रास मिळणार नाहीं, तशीच स्त्री ज्या पतीच्या गोत्रांत एकवार गेली तिला अन्य पति होऊं शकत नाहीं, हें आतां माझ्या ध्यानांत चांगलेंच आलें!

उत्तर १६४ — तुला चांगलें समजलें, येणें करून आह्मालाही आनंद झाला.

प्रश्न १६५ — बरें ज्या अर्थी स्त्रियांस एकच पति होणार; आणि त्यास जर नष्ट मरणादि संभावना आहे, तर स्त्रियानीं पति वरणें तो मुळीच विचार करून व प्रौढ वयांत आल्यावर वरल्यास काय चिंता आहे, जशी प्रौढ नदीच समुद्रास मिळते त्या प्रमाणें ?

उत्तर १६५ — स्त्रियानीं पति स्वतः करणें किंवा वडिलानीं तिला पति करून देणें, तो प्रौढ वयांत आल्याशिवाय वरूंनये किंवा करूनही देऊं नये, असेंच आहे..

प्रश्न १६६ — प्रौढ वयाची इयत्ता कोठ पावेतों समजावी ?

उत्तर १६६ — ऋतु प्राप्तीच्या काळाच्या सुमारावर प्रौढ वयाची इयत्ता समजावी.

प्रश्न १६७ — या वरून स्त्रियांचें वय बारा वर्षां पुढें व सोळांचे आंत असावें असा सुमार सिद्ध झाला. ठीक आहे, बरें पुरुषाचें वय किती असावें, याचाही नियम असेल ?

उत्तर १६७ — होय होय नियम आहे तर, पुरुषाचें वय चोवीस वर्षां पुढें व बत्तिसांच्या आंत असावें

प्रश्न १६८ — स्त्रियांचा पुनर्विवाह करणें यापेक्षांही, वरील व्यवस्था आतां

मला प्रशस्त वाटते, व ही श्रुतीस व युक्तीसही अनुकूळ अशी आहे, पूर्वी स्वधारलेल्या मंडळीच्या सहवासानें म्हणजे पदत मूर्खांच्या सहवासानें, मला असें वाटत होतें कीं, हजारों बालहत्या होतात, त्या स्त्रियांचा पुनर्विवाह चालू केल्यानें बंद होऊन जें पुण्य उत्पन्न होईल, तें पुनर्विवाह चालू करणें एतद्रूप पातकांशीं ताडून पाहिल्यास, पुण्याचेंच पारडें वजनास अधिक भरेल, परंतु तो सर्व भ्रम असें पक्के, यांत संशय नाहीं, तथापि यावर आपलें उत्तर काय आहे, तें मी ऐकायास इच्छितों ?

उत्तर. १६८ — बालहत्या बंद करणें एतद्रूप पुण्यांत, तूंच स्वमुखानें कबूल केलेंस जें स्त्रियांचा पुनर्विवाह एतद्रूप पातक, तें तुमच्या मत्तास अनुसरल्यास वजा पडतें, सबंध पुण्य पदरीं पडत नाहीं; आणि वेदाज्ञेस अनुसरल्यास वजा पडणारें पातक होत नसून सबंध पुण्यच पदरी पडतें, असें जर असेल तर वेदाज्ञाच कां न मानावी; पाहा, लौकिकांतही अशी ह्मण आहे कीं, पाण्या आधीं वळण बांधावें; आणि असें जो करतो तोच चतुर, याच न्यायानें ईश्वरानें, ह्या गोष्टीचा आधींच बंदोबस्त केला आहे, तो असा कीं, स्त्रियानीं पति मरणोत्तर त्या बरोबर सहगमन करावें ह्मणजे सती जावें, ह्या सहगमनास वेदाज्ञेमुळें पातकत्व नसून पुण्यरूपत्वच आहे, आणि स्त्रियांनीं सहगमन न केल्यामुळें, बालहत्यारूप पातक मुळींच उत्पन्न होत नाहीं अर्थात् सबंध पुण्य पदरीं पडतें, तेव्हां अर्धवट पुण्य पदरीं घेऊन, ईश्वराच्या घरीं अन्यायी होण्यापेक्षां, सबंध पुण्य पदरीं पाडून ईश्वराच्या घरीं न्यायी व्हावें, हें चांगलें, असें आमचें उत्तर आहे, यावर तुझी काय शंका असेल ती बोल.

प्रश्न १६९ — यावर माझी शंका नाहीं, कारण मला एकशेंसत्तेचाळिसावें उत्तर जें आपण दिलेलें त्याचें स्मरण होतें, पण यावर माझें इतकेंच ह्मणणें आहे कीं, पूर्वी स्त्रिया जशा धैर्यवान् होत्या तशा आतां नाहींत, तेव्हां यास कांहीं प्रत्याम्नाय असावा ?

उत्तर १६९ — सती न जाववेल तर, ब्रम्हचर्य धर्मानें पतीच्या मागें स्त्रीनें रहावें, असा प्रत्याम्नाय आहे, परंतु कदाचित् या पासून पतन संभावना आहे, म्हणून मुख्यपक्षच चांगला.

प्रश्न १७० — खरें, पण स्त्रिया कबूल पाहिजेत ना ?

उत्तर १७० – जर स्त्रिया सहगमनास कबूल नसतील, तर ब्रम्हचर्य धर्म, त्यांस कबूल करणें भाग आहे, त्यांत जर चुकल्या तर, त्यांचे कर्म त्यांस बाधेल.

प्रश्न १७१ – विषयसुख भोगण्यास कायता मनुष्यदेह, आणि वेदाचा कटाक्ष तर विषय निवृत्तीवर, त्यामुळें इकडे आड इकडे विहीर असें झाल्या-प्रमाणें मला होऊन कांहीं प्रश्नच पुढें सुचत नाहीं

उत्तर १७१ – मनुष्य देह विषयभोग घेण्यासाठीं मुळींच ईश्वरानें दिला नाहीं, किंवा आला नाहीं, तर ईश्वरानें हा देह विषय निवृत्तीसाठींच दिला आहे, मागील एकसष्ठाव्या प्रश्नोत्तरा पासून एकुणसत्तराव्या प्रश्नोत्तराचें स्मरण कर, त्यावरून पूर्वीं जे जन्म जीवास झाले, त्यांत जीवानें विषय सुख पुष्कळ भोगिलें आहे, म्हणून ही अडचण पूर्व जन्म व पुनर्जन्म न मानणारे जे नास्तिक व पाषांडी आहेत, त्यांस असेल तर असो, आह्मा आस्तिकांस नाहीं व तुलाही नसावी.

प्रश्न १७२ – खरी गोष्ट, आपण मला चांगलें स्मरण दिलें, आतां यांत सारांश हाचकीं, स्त्रियांस पुनर्विवाह नाहीं, सुधारलेले लोक वेडेपणानें, ईश्वराज्ञे विरुद्ध ही खटपट करितात, परंतु हे फशीं पडतील, असाच सिद्धांत कीं नाहीं ?

उत्तर १७२ – असाच असाच असाच सिद्धांत, म्हणजे स्त्रियांस पुनर्विवाह नाहीं, हाच वास्तविक सिद्धांत.

प्रश्न १७३ – हा विषय माझ्या पदरांत चांगल्या रीतीनें पडून मला मान्य झाला, आतां वेदा विषयीं प्रश्न त्या गृहस्थाचा असा आहे कीं, वेद एक असतां त्याचे च्यार भाग कां झाले ? व हे च्यार भाग कधीं व कोणी केले ? कित्येक पाषांडी तर, वेद अगदीं अलीकडे झाला असें म्हणतात, तेव्हां यावर काय उत्तर द्यावें ?

उत्तर १७३ – सृष्टि बहुकाळा पूर्वींची सिद्ध असल्यामुळें, तिजवरील राहणाऱ्या प्राण्यांस नियमन करणारें शास्त्रही, त्याच काळीं झालें पाहिजे, ह्मणून वेद अर्वाचीनकाळीं झाला, असें जे पाषांडी ह्मणतात, ते मूर्ख आहेत, प्रजा आणि तिला नियमन करणारे निर्बंध, मनुष्यांच्या हातून मागें पुढें होतील, परंतु ईश्वरी निर्बंध तसा नव्हे, तो ईश्वरानें सृष्टिस-

मयींच बालक जन्मास येण्या पूर्वी, जसें आईच्या स्तनांत त्याचें जीवन जें दुग्ध तें सिद्ध असतें त्याप्रमाणें, केलेला आहे, सारांश वेद फार प्राचीन असून यज्ञादि कित्येक कार्यास्तव, त्याचे च्यार भाग झाले व ते व्यासनामक एका प्रख्यात ऋषीनें केले.

**प्रश्न १७४** — हे च्यार भाग कधीं झाले, व व्यास ऋषि हा कोणाचा कोण ?

**उत्तर १७४** — सांप्रत जो ब्रम्हदेवाचा दिवस चालला आहे, ज्यास आपण श्वेतवाराहकल्प असें ह्मणतों, यांतील दोनपर्याय म्हणजे दोन चौकड्या गत झाल्यावर किंवा दोन महा युगें गेल्यावर, तिसरी चौकडी अथवा पर्यय किंवा महायुग यांतील द्वापार युगांत वेदाचे च्यार भाग झाले, हे ज्या व्यास ऋषीनें केले, तो परांशर ऋषीचा पुत्र व शुकाचार्याचा पिता होय.

**प्रश्न १७५** — पण हा व्यास, पराशरा पासून सत्यवती ह्मणून जी, ह्या गत द्वापारांत शंतनुराजाची स्त्री पुढें लवकरच झाली, तिच्याच ठायीं झालेला ना! आणि जर असें असेल, तर अठ्ठाविसाव्या पर्यायाच्या द्वापारांतीं व्यास झाला, असें होतें तेव्हां हें कसें ?

**उत्तर १७५** — वेदाचे च्यार भाग व त्यांतील शाखा यांचें निरूपण, श्रीरामचंद्र आणि मारुति यांच्या संवादरूपानें, मुक्तिकोपनिषदांत, चांगल्या रीतीनें आढळतें, यास्तव अठ्ठाविसाव्या पर्यायांतच व्यासाची वास्तविक उत्पत्ति आहे असें होत नाहीं, तर तिसऱ्याच पर्यायांत व्यास झाले असाच सिद्धांत होतो.

**प्रश्न १७६** — तिसरा पर्याय ह्मणजे तिसरें युग जें द्वापार तें, असा अर्थ कां नसेल ?

**उत्तर १७६** — पर्याय म्हणजे चौकडी असा अर्थ फार ठिकाणीं उपलब्ध आहे, यास्तव तसा अर्थ होत नाहीं व होणारही नाहीं, जर तिसरा पर्याय ह्मणजे द्वापार युग असा अर्थ केला तर लंकादेवीनें मारुतीस अठ्ठाविसाव्या पर्यायांत राम होईल, त्याचा कोणी एक दूत तुला सीताशुद्धी समयीं बुक्की मारील व तूं रक्त ओकशील, तेव्हां रावणाचा काळ जवळ आला असें समज, ह्मणून जें भविष्य ब्रह्मदेवानीं लंकादेवीस सांगितलें होतें, त्याचा अर्थ कोणतें युग ह्मणून लावावा, यास्तव नीट विचार करून पहा.

**प्रश्न १७७** — तर मग त्या सत्यवतीस व्यास झाला, असें जे ह्मटलें आहे, त्याची वाट काय ?

उत्तर १७७ – वसिष्ठ ऋषि ब्रम्हदेवाचे मानस पुत्र असल्यामुळें, ब्रह्मपुत्र असतां, वेश्या पुत्र वसिष्ठ हें जसें क्वचित् प्रसिद्ध आहे, तसेंच हे ही आहे असें समज.?

प्रश्न १७८ – बरें व्यास ऋषीचे च्यार वेद म्हणणारे शिष्य कोण कोण होते ?
उत्तर १७८ – ऋग्वेद म्हणणारा एक शिष्य पैलऋषि, यजुर्वेद म्हणणारा दुसरा वैशंपायन ऋषि, सामवेद म्हणणारा तिसरा जैमिनीऋषि, आणि चौथा अथर्वण वेद म्हणणारा सुमंतु नामक ऋषि, या प्रमाणें च्यार वेद म्हणणारे च्यार शिष्य होते, या चौघानीं आप आपल्या वेदांमध्यें अनेक शाखा करून, ती प्रत्येक शाखा पढणारा एकेक ऋषि असा आप आपला शिष्य केला.

प्रश्न १७९ – पैल इत्यादिकानीं आप आपल्या वेदामध्यें किती किती शाखा केल्या ?

उत्तर १७९ – मुक्तिकोपनिषदा वरून, पैलऋषीनें ऋग्वेदांत एकोणीस शाखा केल्या, वैशंपायन ऋषीनें यजुर्वेदांत शाहायशीं शाखा केल्या, जैमिनीनें सामवेदांत एक सहस्र शाखा केल्या, आणि सुमंतु ऋषीनें अथर्वणांत पन्नास शाखा केल्या.

प्रश्न १८० – यज्ञकाळीं कोणत्या वेदाच्या ब्राह्मणानें कोणीकडे बसावें म्हणून नियम आहे ?
उत्तर १८० – ऋग्वेदानें पूर्वेकडे बसावें, यजुर्वेदानें दक्षिणेकडे बसावें, सामवेदानें पश्चिमेकडे बसावें, अशा प्रकारें नियम आहे.
प्रश्न १८१ – मंत्र म्हणण्याचा क्रम कसा आहे ?
उत्तर १८१ – ऋक्, यजु, साम, याणीं एकामागें एकानें क्रमानें मंत्र म्हणावा असा नियम आहे.

प्रश्न १८२ – कण्व मध्यंदिनादिक शाखा यजुर्वेदांतील शायशीं भेदांतच कीं नाहींत ?
उत्तर १८२ – नाहींत, त्या पंधरा शाखा, व्यासकृत वेदाहून अगदीं भिन्न आहेत.
प्रश्न १८३ – या दोहोंत मुख्य यजुर्वेद कोणता ?
उत्तर १८३ – व्यासशिष्य वैशंपायनकृत शायशी भेद, तो मुख्य यजुर्वेद

होय.

प्रश्न १८४ – पंचदश शाखारूप जो यजुर्वेद, त्यास जर मुख्य यजुर्वेदत्व नसतें, आणि वैशंपायन कृत यजुर्वेदास असतें, तर पंचदशशाखास शुक्ल यजु आणि दुसऱ्यांस कृष्ण यजु अशीं नावें न पडतीं, तस्मात् मला वाटतें, ज्यांस शुक्ल यजु नाव आहे, तोच यजुर्वेद मुख्य व शुद्ध असावा, इतर अमुख्य आणि अशुद्ध असावा !

उत्तर १८४ – शुक्ल यजु आणि कृष्ण यजु यांचा अर्थ येथे शुद्ध आणि अशुद्ध, असा ग्रहण करायाचा नाहीं, तर येथे पूर्व यजु आणि उत्तर यजु असा अर्थ समजायाचा, असें समज.

प्रश्न १८५ – तरी काय झालें ! यावरून तरी शुक्लयजूंचेंच पूर्वत्व आणि कृष्णयजूंचें उत्तरत्व असेंच सिद्ध होतें, जसें महिन्याच्या शुक्ल कृष्ण दोनपक्षांस क्रमानें पूर्वोत्तरत्व असतें त्या प्रमाणें ?

उत्तर १८५ – नाहीं नाहीं, तूं म्हणतोस तें सशास्त्र नाहीं, सशास्त्र कृष्णपक्ष पूर्वी आणि शुक्लपक्ष नंतर, असाच निर्णय समज ! येविषयीं कार्तिक स्नानांचा महिना कसा धरला जातो, तो पंचांग इत्यादिकांत पाहून लक्षांत आण म्हणजे तुझी खात्री होईल.

प्रश्न १८६ – वादी हें ऐकून निरुत्तर होतो, आणि अंमळ उगाच राहून पुनः म्हणतो आपण सांगितलेंत हें तर खरेंच पण मला असें वाटतें कीं, आमच्या याज्ञवल्क्याचा यजुर्वेद शुद्ध असावा, आणि दुसरा अशुद्ध असावा. कारण तो याज्ञवल्क्याचा टाकलेला वेद, केवळ अग्नीच्या इंगळा प्रमाणें पडलेला तित्तिरी पक्ष्याच्या रूपानें कोणेका ऋषीनें ग्रहण केला, यास्तव, याज्ञवल्क्याची योग्यता मोठी आणि तित्तिरीची उणी, अतएव अध्वर्यत्व याज्ञवल्क्याचें असावें, तित्तिरीचें नसावें.!

उत्तर १८६ – याज्ञवल्क्य गुरूच्या कोपानें वेदबाह्य झालेला, अध्वर्यत्वास मुळींच अनधिकारी होय, याज्ञवल्क्या पासून गुरूनें माघारा घेतलेला वेद ज्या ऋषीस कृपा उत्पन्न होऊन दिला, तो तित्तिरी ऋषि गुरूचा कृपापात्र असल्यामुळें, तोच अध्वर्यत्वाचा वास्तविक अधिकारी, शापित याज्ञवल्क्य नव्हे.

प्रश्न १८७ – पण याज्ञवल्क्य तसाच वेदबाह्य राहिला नाहीं, त्यानें पुनः

वेद संपादन केला आहे, मग त्यास अध्वर्यवत्वाचा अधिकार कां नसावा?

उत्तर १८७ -- या पृथ्वीवर याज्ञवल्क्य वेदबाह्य झाला असून, त्यानें आपल्या पुरुष प्रयत्नानें पुनः वेद संपादन केला, हा त्याचा पराक्रम निःसंशय अवर्णनीय खरा, शिवाय तो ब्रह्मनिरही झाल्या असल्यामुळें, सर्वत्र वंद्य झाला, आणि त्यामुळें तो अध्वर्यवत्वाधिकारास योग्य हें ही खरें, परंतु याज्ञवल्क्य विद्या संपादून येई पर्यंत, अवकाश लागल्यामुळें इकडे पृथ्वीवर अध्वर्यवत्व तित्तिरी ऋषीचें चालू होऊन, तो अध्वर्यवत्वाचा अधिकारी ठरला गेला, ह्मणून ती जागा भरली गेली असून, याज्ञवल्क्यास जागा नाहींशी झाली, याला कोणाचा काय उपाय याचा तूंच विचार कर.

प्रश्न १८८ -- याज्ञवल्क्यानें, बळेनेंच अध्वर्यवत्व कां केलें नाहीं?

उत्तर १८८ -- याज्ञवल्क्य विचारवान् होता, ह्मणून त्यानें तसें केलें नाहीं, इतक्यावर अविचारानें जर तो तसें करता, तर स्वर्गामध्यें झालेल्या चौदा इंद्रांच्या नेमणुकींतील एका इंद्रास नहुष राजानें गादीवरून काढून आपण बलात्कारानेंच इंद्रासनाधिकार करूं लागला असतां, जसा पदभ्रष्ट होऊन सर्पयोनीस गेला, तसा याज्ञवल्क्य नाश पावला असतां व नीच योनीस गेला असतां.

प्रश्न १८९ -- बरें याज्ञवल्क्याचें असो. कण्वऋषीस अध्वर्यवत्वाधिकार कां नसावा?

उत्तर १८९ -- जागा भरली गेल्यामुळेंच कण्वऋषीसही जागा राहिली नाहीं असें समज.

प्रश्न १९० -- एवंच हे मागले यजूच खरे, आणि त्यामुळेंच पूर्व यजूंस अध्वर्यवत्वाधिकार मिळाला व हे रिकामे राहिले, असेंच कीं नाहीं?

उत्तर १९० -- होय असेंच.

प्रश्न १९१ -- हे तर माझ्या ध्यानांत चांगलें भरलें, आतां मी असें पुसतों कीं, पूर्व यजूंत शायशी भेद असून, त्या त्या शाखांच्या सर्व ऋषींत तित्तिरि ऋषिच श्रेष्ठ का झाला?

उत्तर १९१ -- तुमच्या पंधरा शाखांच्या पंधरा ऋषींत, जसा कण्व ऋषि श्रेष्ठ झाला, तसाच शायशींत तित्तिरि ऋषि श्रेष्ठ झाला असें समज.

प्रश्न १९२ -- यावरून व्यासकृत वेद विभागांतील यजुर्वेदांत मुख्यत्वें क-

रून. तैत्तिरीय शाखेस आहे, पण यास प्रमाण काय ? आमच्या यजुर्वेद तर, व्यासकृत विभागांतील नसल्यामुळें, त्याचा या पृथ्वीवर अध्वर्यवत्वादि प्रकरणांत कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं, व आमच्या यजुर्वेद्यांनीं आम्ही अध्वर्यु, आमचा मंत्र आधीं झाला पाहिजे, असे पोश सोशासारखें भांडत बसणें ह्राहीवेडेपणाच, हें मी पक्कें व निःसंशय समजलों आहें ?

उत्तर १९२ – तैत्तीर्य शाखेस मुख्य यजुर्वेदत्व आहे, येविषयीं श्रुति प्रमाण आहे, मनोमय कोशाचीं अंगें सर्ववेदरूप असून, तो मनोमय कोश पक्ष्याच्या रूपकानें श्रुतीनें वर्णिला आहे.

प्रश्न १९३ – मनोमय कोशाचीं सर्व अंगें श्रुतीनें वेदरूप वर्णिलेलीं युक्त च आहेत, पण श्रुतीनें मनोमयास पक्षी म्हणून जें रूपक केलें, यांत तित्तिरीशीं काय संबंध झाला किंवा आहे ?

उत्तर १९३ – श्रुतीनें मनोमय कोशरूप पक्ष्याचें शिर यजुर्वेद म्हटलें आहे, तेंच शिर तित्तिरी नामक ऋषीचें आहे, हाच तित्तिरीचा मनोमयाशीं संबंध झाला किंवा आहे असें समज..

प्रश्न १९४ – मनोमय कोशरूप पक्ष्याचें शिर यजुर्वेद श्रुतीनें म्हटलेलें ठिकच आहे, पण तोचवेद तित्तीरीचें शिर असें कशावरून ?

उत्तर १९४ – यजुर्वेदामध्यें पक्षीरूपानें विद्या ग्रहण केली, असा तुझ्याच म्हणण्यावरून जर एक तित्तिरी ऋषि मात्र आहे, तर मनोमय कोशरूप पक्ष्याचें मुख्यांग अथवा शिर जसें यजुर्वेद आहे तसेंच तित्तिरी ऋषीचें आहे म्हणजे तैत्तीर्य शाखेचें शिरही यजुर्वेदच आहे, कारण ती शाखाच यजुर्वेदाची आहे.

प्रश्न १९५ – यजुर्वेदांतील शाखेस मुख्य यजुर्वेदत्व कसें येईल ?

उत्तर १९५ – हें शरीर अमुकाचें; हा निर्णय जसा शिरावरून होतो, तसा तित्तिरीच्या शरीराचा निर्णय, त्याचें शिर यजुर्वेद आहे, असें श्रुतीनेंच म्हटलें आहे, म्हणून ऐताच होतो, मग तैत्तीर्य शाखेस मुख्य यजुर्वेदत्व येण्यास बाध तो कोणता ? कांहींच बाध नाहीं.

प्रश्न १९६ – बरें मनोमयास श्रुतीनें तित्तिरीपक्षीच असें कल्पिलें असेल म्हणून कशावरून ?

उत्तर १९६ – मनोमयाचें आणि तित्तिरीचें आहार साम्य आहे यावरून.

प्रश्न १९७ – तें आहार साम्य कसें व कोणतें ?

उत्तर १९७ – मनोमयास विद्येचा आणि अविद्येचा आदेश आत्मा श्रुतीनें सांगितला आहे, आदेश ह्मणजे उपदेश, हाच आहार म्हणजे हाच त्याचा आत्मा अथवा जीवन, तसाच तित्तिरीस अविद्या स्थानापन्न साधारण अन्न आणि विद्या स्थानापन्न अग्नीचे इंगळ आहार आहे, अशा प्रकारें मनोमयाचें आणि तित्तिरीचें साम्य आहे.

प्रश्न १९८ – तैतीर्य शाखेस मुख्य यजुर्वेदत्व हें तर जसें व्हावें असें सिद्ध झालें, आणि ऋक् साम हे दोनी वेद त्याचे पूर्व पश्चिम बाजूचे, क्रमें करून दक्षिणोत्तर पक्ष असल्यामुळें, त्याचें अध्वर्यत्वही सिद्ध झाले, हें मला मानवलें, पण आपस्तंबादिक हे कोण आहेत ?

उत्तर १९८ – तित्तिरी ऋषीनें, आपल्या तैतीर्य शाखेचे, उपशाखारूप कित्येक भेद करून, आपस्तंब, हिरण्यकेश, सत्याषाढ, इत्यादि कित्येक ऋषींस पढविले, त्या उपशाखांचें अध्ययन सांप्रत जे करणारे आहेत, त्यांसच आपस्तंब, हिरण्यकेशी इत्यादि नावें आहेत असें समज.

प्रश्न १९९ – वेदाविषयीं प्रश्न करणारा मध्यंदिन शाखीय गृहस्थ, हीं उत्तरें ऐकून आनंद पावतो, आणि सिद्धांती यांचे चरणावर मस्तक ठेऊन नमस्कार करून म्हणतो, महाराज ! माझें समाधान झालें, मात्र आपल्यास मी श्रम दिले, याची मला क्षमा असावी ?

उत्तर १९९ – कांहीं नाहीं, यांत श्रम ते कोणते ? तुझें समाधान झालें येणेंकरून जरी श्रम झाले असें तुला वाटत असेल, तरी त्याचें साफल्य झालें, म्हणून आम्हास संतोष झाला, तुझें कल्याण असो.

प्रश्न २०० – पूर्ववादी म्हणतो, महाराज ! वेद शब्दाचा अर्थ तर ज्ञान आहे, तेव्हां ज्ञानच ईश्वरी निर्बंध असें कसें होईल, कारण ज्ञान कांहीं मूर्तिमान् नाहीं, अमूर्त आहे, तेव्हां हें कसें ?

उत्तर २०० – ईश्वराचें ज्ञान अक्षररूपानें जें प्रगटलें, त्यास वेद असें ह्मटलें आहे, हेंच त्यास मूर्तित्व आलें, अतएव वेदरूप निर्बंध साक्षात् ईश्वराचें ज्ञान, अथवा ईश्वरी ज्ञानानें वेदरूप निर्बंध सिद्ध झाला असून, तो ईश्वरा बरोबरच सिद्ध असा आहे.

प्रश्न २०१ – बरें महाराज, यवनादिकांनीं, केलेले जे ईश्वर प्राप्तिविषय-

क ग्रंथ, ते सप्रमाण कीं अप्रमाण ?

उत्तर २०१ — ईश्वरप्राप्ति विषयक ग्रंथांत अनुबंध चतुष्टय ए लागतो, आणि तो जरी बहुधा सर्व ग्रंथांत, बहुधा प्रकरणानुरोधा- आढळतो, तरी, ईश्वर प्राप्तीचें जें प्रकरण त्यास अनुसरून नसतो, यामु ळें, यवनादिकांच्या ग्रंथांस त्याच्या अभावास्तव अप्रामाण्यच आहे, असें सहज सिद्ध होतें.

प्रश्न २०२ — अनुबंध चतुष्टय म्हणजे काय.?

उत्तर २०२ — विषय, संबंध, प्रयोजन, आणि अधिकारी, या चोहोंचा समुदाय, याचें नाव अनुबंधचतुष्टय.

प्रश्न २०३ — या प्रत्येकाचें निरनिराळें रूप कसें, तें ऐकण्याची माझी इच्छा आहे ?

उत्तर २०३ — ईश्वरप्राप्ति विषयक ग्रंथांत, जीव आणि ईश्वर यांचें ऐक्य हा विषय असावा लागतो, ईश्वर हा साध्य आणि जीव हा साधक, याचें नाव संबंध, जन्म मरणरूप अनिष्टाची निवृत्ति, आणि सत्यानंदाची प्राप्ति, या उभयरूपतेचें नाव प्रयोजन, आणि हीं तिन्ही साधणारा जो साधनचतुष्टय संपन्न जीव, तो येथील अधिकारी, हे च्यार प्रकार ज्या ग्रंथांत नाहींत, तो ग्रंथ ईश्वरप्राप्ति विषयक नसून वेदबाह्य त्यास्तव अप्रमाण असा समजावा.

प्रश्न २०४ — साधनचतुष्टय तें कोणतें ?

उत्तर २०४ — विवेक, वैराग्य, शमदमादि षट्क, आणि मुमुक्षा, यास साधनचतुष्टय असें म्हणावें.

प्रश्न २०५ — या प्रत्येकाचें रूप कसें ?

उत्तर २०५ — नित्य काय आणि अनित्य काय याचा जो विचार त्याचें नाव विवेक, विवेकें करून नित्य निवडून घेतल्यावर राहिलें जें अनित्य म्हणजे इहलोकचे आणि परलोकचे म्हणजे स्वर्गादि लोकचे विषय त्याची अप्रीति तें वैराग्य, मनोनिग्रह, इंद्रिय निग्रह, नित्य वस्तूकडे लक्ष्य, सुख दुःख सहन, वेद आणि गुरु यांच्या वचनीं विश्वास, आणि यथा प्राप्तानें संतोष, याचें नाव शमदमादि षट्क, आणि मुमुक्षा म्हणजे जन्म मरणा पासून सुटण्याची इच्छा, असें हें प्रत्येकाचें रूप आहे.

प्रश्न २०६ — यवनादिकांच्या मतवाद्यानीं केलेल्या ग्रंथांत याचा तर आगदीं

प्रश्न १०५ आहे ?

उत्तर १०५-१०६ – म्हणुनच त्यास पाषांडी ह्मणतात.

प्रश्न २०७ – पण महाराज ! यवनांतही कित्येक अवलीया फार उत्तम होऊन गेलेले असून, सांप्रतही आहेत हें कसें ?

उत्तर २०७ – अंत्यजां प्रमाणें यवन वेदबाह्य जरी आहेत, तरी वेद संप्रदाया प्रमाणें त्यांच्यांत ज्ञान परंपरा अनादिच आहे, त्या परंपरेचेच यवन अवलीया झाले किंवा आहेत असें समज. कुराण, बैबल, इत्यादि मताचे जे दुराग्रही यवन ते अवलीया कधींच होणारे नव्हत

प्रश्न २०८ – पाषांडी आणि नास्तिक, हे दोघे एकच कीं यांत कांहीं भेद आहे

उत्तर २०८ – नास्तिक म्हणजे ईश्वर नाहीं, परलोक नाहीं, जन्म काय प्राप्त झालेला हाच, पूर्वजन्म व पुनर्जन्म नाहीं, वेद नाहीं इत्यादि मानणारा आणि ईश्वर आहे, परलोक आहे असें मानतो, परंतु जन्मकायतो हाच पूर्वजन्म पुनर्जन्म नाहीं, वेद नाहीं, इत्यादि मानणारा, हे दोघेही पाषांडी-परंतु त्यांत एकनास्तिकपाषांडी, आणि एक आस्तिक पाषांडी असा भेद आहे

प्रश्न २०९ – यावरून वेदबाह्य मत, ज्यास स्वकपोलकल्पित मत म्हणतात तदनुरूप चालणारा जो, तो पाषांडी असें ह्मटल्यास चालेल कीं नाहीं?

उत्तर २०९ – चालेल.

प्रश्न २१० – बरें वेदांती आणि पाषांडी किंवा नास्तिक, यांचें बहुत करून साम्य आहे, अशी जी लोकांत म्हण आहे, ती खरी कीं कसें ?

उत्तर २१० – शब्दज्ञानी ज्यांस तोंडाळवेदांती म्हणतात, ते आणि नास्तिक जरी सारखे वागतात तरी नास्तिक वस्तु ज्ञानशून्य आणि हे किंचित् तरी पण ज्ञानी असल्यामुळें, पुष्कळ अंशीं जरी त्यांचें यांचें साम्य आहे, तरी त्या एकांशानें वेदांती नास्तिकाहून अधिक आहेत.

प्रश्न २११ – यावरून वेदांती यामध्यें दोन भेद आहेत असें झालें ?

उत्तर २११ – होय शब्दज्ञानी वेदांती, आणि स्वानुभवी वेदांती असे वेदांती यांत दोन भेद आहेत

प्रश्न २१२ – शब्दज्ञानी वेदांती म्हणजे साधन रहित किंवा अक्रिय वेदांती, आणि स्वानुभवी वेदांती म्हणजे, साधनी अथवा सक्रिय वेदांती, असाच [illegible] कीं नाहीं ?